अतारांकित प्रश्नोत्तरांची ५१ वी यादी

# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२६**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## मुंबई उपनगरातील मालड (प.) येथील एसआरए प्रकल्पांतर्गत बांधलेल्या संक्रमण शिबीराची झालेली दुरवस्था

**(१) ७९ (२७-०४-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मालाड पश्चिम येथील कार्तिक सोसायटी काचपाडा नं. १ येथे एसआरए प्रकल्पांतर्गत बांधलेल्या संक्रमण शिबीराची (ट्रान्झिट कॅम्प) दुर्दशा झाल्याने तेथील रहिवाशांना पाणीपुरवठा, शौचालय व इतर सुविधांपासून वंचित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या अनेक वर्षांपासून ४५ कुटुंबांना मुलभूत सोयी-सुविधापासून वंचित असून त्यांच्या पुर्नविकासाचे काम प्रलंबित असल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संक्रमण शिबीराच्या (ट्रान्झिट कॅम्प) पुर्नविकास प्रकल्पातील रहिवाशांना सोई-सुविधा पुरविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०६-२०२६) :** (१), (२) व (३) कार्तिक गृहनिर्माण संस्थेकरिता तळ मजला+ ५ मजल्याचे संक्रमण शिबीर बांधण्याकरीता दिनांक २३/०६/२०२३ रोजी परवानगी देण्यात आली आहे. सदर बांधकाम जून, २०२४ मध्ये बांधून झाले असून त्यामध्ये एका मजल्यावर २८ अशा एकूण ५ मजल्यावर १६८ सदनिका झोपडीधारकांना वाटप केल्या आहेत. तद्नंतर विकासकाला तळ मजला + ७ मजल्याचे संक्रमण शिबीर बांधण्याकरिता सुधारित परवानगी दिनांक १६/०८/२०२४ रोजी देण्यात आली आहे. सदर संक्रमण शिबीरामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पी-फॉर्म व्दारे अधिकृत नळ जोडणी प्राप्त असून पाणी नियोजनाकरिता ओव्हर हेड वॉटर टँक व ग्राउंड वॉटर टँक अंदाजे ६० हजार लिटर इतक्या क्षमतेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच, संक्रमण शिबीरामध्ये प्रती मजला ८ असे एकूण ४८ शौचालये उपलब्ध करुन दिली आहेत. तसेच, २ उदवाहक प्रस्तावित आहेत त्यापैकी एका उदवाहकाचे काम पूर्ण झाले असून दुसऱ्या उद्वाहकाचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मालेगाव ( जि.नाशिक ) येथील महानगरपालिकेच्या वाहनांसह इतर लोखंडी साहित्य वर्षानुवर्ष पडून असल्याबाबत

**(२) ७२३ (२९-०४-२०२५). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) येथील महानगरपालिकेच्या वाहनांसह इतर लोखंडी साहित्य अनेक ठिकाणी वर्षानुवर्ष

पडून असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यातील काही वाहनांचे सुटे भाग चोरीस जाण्याची शक्यता असून त्यामुळे मनपाला हजारो रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, वाहनांसह लोखडी साहित्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०७-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे, मालेगाव येथील महानगरपालिकेच्या वाहनांचे लोंखडी साहित्य एकाच ठिकाणी मालेगाव महानगरपालिकेचे कंपोस्ट डेपो येथे ठेवण्यात आलेले आहे.
(२) व (३) हे खरे नाही, मालेगाव महानगरपालिकेच्या कंपोस्ट डेपो येथे वॉचमनची नेमणुक केली असल्याने वाहनांचे भाग चोरीस जाण्याची शक्यता नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## (ता. वडवणी, जि. बीड) येथील साळींबा ठिंबक उपसा सिंचन योजनेबाबत

**(३) ८०८ (२५-०४-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) (ता. वडवणी, जि. बीड) येथे साळींबा ठिंबक उपसा सिंचन योजनेस जलसंपदा विभागाने दिनांक ३१ जुलै, २०२४ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेची ई- निविदा करण्यास शासनाने परवानगी दिली आहे काय, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
विभागाच्या दिनांक ३१/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये, साळींबा ठिबक उपसा सिंचन योजनेस जायकवाडी टप्पा-२ चा भाग म्हणून तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) जायकवाडी टप्पा-२ चा पंचम सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

---

## इसापूर (जि.नांदेड) धरणाच्या उजव्या कालव्याच्या कुर्तडी गावाजवळुन कळमनुरी तालुक्यातील जमिनी सिंचनाखाली आणण्याबाबत

**(४) ११८२ (०१-०५-२०२५). श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इसापूर (जि.नांदेड) धरणाच्या उजव्या कालव्याच्या कुर्तडी गावाजवळुन (ता.कळमनुरी) शाखा कालवा किंवा वितरीका काढल्यास हदगाव तालुक्यातील मनाठा, कनक्याची वाडी, शिबदरा, जगापूर, गायतोंड, कार्ला, चिंचगव्हाण, बामणी तांडा, बामणी, पिंपरखेड, करमोडी, बरडशेवाळ, खरबी, पळसा, गारगव्हाण यासह इतर १० ते १२ गावातील शेतीला सिंचानाचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावातील शेतकरी गेल्या २० वर्षापासून इसापूर धरणाच्या उजव्या कालव्याच्या कुर्तडी

गावाजवळून शाखा कालवा किंवा वितरीका काढण्याबाबत करीत असलेल्या मागणीवर अद्यापही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शेतक-यांच्या जमिनी सिंचनाखाली याव्यात याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी कुर्तडी गावाजवळन शाखा कालवा किंवा वितरीका काढण्यात यावी अशी मागणी उपमुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-०६-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

इसापूर उजव्या कालव्याच्या कुतर्डी या गावाजवळ उल्लेख केलेली सदरील गावे असिंचित क्षेत्रामध्ये असल्यामुळे प्रवाही पध्दतीद्वारे या गावांना सिंचनाचा लाभ देता येणे शक्य नाही.

तथापि, या ठिकाणी उपसा सिंचन योजनेद्वारे पाणी उपलब्धता मिळण्याच्या अधिन राहून सदरील गावे सिंचनाखाली आणता येतील.
(२) हे खरे नाही.

सदर कामाचे सर्वेक्षण करण्याचा प्रस्ताव मंडळ कार्यालयामार्फत दिनांक १८/०९/२०२४ चे पत्रान्वये प्रादेशिक कार्यालयास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर प्रादेशिक कार्यालयाचे दिनांक ०९/१०/२०२४ चे पत्रान्वये सर्वेक्षणाची पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

विभागाच्या शासन निर्णय दिनांक २३/११/२०१६ मधील तरतुदीनुसार विभागीय स्तरावर प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) विभागाच्या शासन निर्णय दिनांक २३/११/२०१६ मधील तरतुदीनुसार विभागीय स्तरावर प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जोगेश्वरी (पूर्व ) येथील रेल्वेच्या हद्दीतील सोशल वेल्फेअर, इंदिरानगर, अंबोली फाटक येथील झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(५) १३२१ (०१-०५-२०२५). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी (पूर्व) येथील रेल्वेच्या हद्दीतील सोशल वेल्फेअर, इंदिरानगर, अंबोली फाटक येथे गेल्या ५० ते ६० वर्षापासून १२५ झोपडीधारक वास्तव्य करित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त झोपडीधारकांपैकी ५२ झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन अदयापी बाकी असून सद्य:स्थितीत रेल्वे प्रशासनाच्या नविन उपक्रम नुसार झोपडया हटविणे आवश्यक असल्याने प्रशासनाकडून झोपडीधारकांना १ जानेवारी, २०२५ रोजी त्यांची राहत्या घरातून ४८ तासात निष्कासित करण्याची नोटिस बजावण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त झोपडीधारक पुनर्वसनास पात्र असूनही त्यांचे पुनर्वसन न करता झोपडया निष्कासित करण्यात येत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधिंनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार

उक्त ५२ झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन तात्काळ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०६-२०२६) :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील कलम ३ (Z) (६) मधील तरतूदीनूसार तसेच, विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली २०३४ च्या विनियम ३३ (१०) च्या कलम १.११ नुसार केंद्र शासनाच्या जमिनीवरील झोपडपट्टयांचे संबंधित जमिन मालकाच्या (केंद्र शासनाच्या) ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय पुनर्वसन करता येणार नाही. सदर जागा ही केंद्र शासनाच्या अखत्यारीत असल्याने त्याअनुषंगाने केंद्र शासनाकडे ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

---

## अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील धरणातुन जायकवाडी धरणात पाणी सोडण्याची मंदाडे समितीची शिफारस लागु न करण्याबाबत

**(६) २१७० (०१-०५-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंपत्ती प्राधिकरणाच्या समन्यायी पाणी तत्वानुसार दरवर्षी दिनांक १५ ऑक्टोंबर रोजी जायकवाडी प्रकल्पात किमान ६५% पाणी असावे त्या पेक्षा कमी असल्यास उर्ध्व भागातील अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील धरणातुन जायकवाडी धरणात पाणी सोडण्याचा समन्यायी पाणी वाटप कायदा अस्तित्वात असून नव्याने नेमलेल्या पाणी वाटप अभ्यास गटाने ६५% वरून ५८% करण्याची शिफारस केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळग्रस्त मराठवाड्याला जायकवाडी प्रकल्पाच्या ऊर्ध्व भागातून ७ टक्के पाणी कमी देण्याची शिफारस गोदावरी अभ्यासगट समितीने महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरणाला केली आहे. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गोदावरील जलविकास आरखाडा अद्ययावत नसतांना जलसंपदा विभागाने समन्यायी पाणीवाटप प्रश्नी नियुक्त केलेल्या प्रमोद मांदाडे यांच्या अध्यक्षतेखालील अभ्यासगटास पुरविलेल्या कालबाहय माहितीच्या आधारावर अभ्यासगटाने मराठवाडयाचे आठ टक्के पाणी करण्याची शिफारस जलसंपत्ती नियमन प्राधिकरणला केल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दुष्काळग्रस्त मराठवाड्यावर मंदाडे समितीने केलेल्या शिफारशी अन्यायकारक आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या अभ्यासगटाला कालबाहय माहिति पुरविणाऱ्या अधिका-यांवर तसेच मंदाडे समितीची शिफारस लागु न करण्याच्या निर्णयाबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०६-२०२६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

जायकवाडी धरणाच्या उर्ध्व बाजुकडील धरणात साठणाऱ्या पाण्याचा योग्य प्रकारे वाटप होण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याकरिता सन २०१३ गठीत मेंढेगिरी समितीने सादर केलेल्या अहवालात भविष्यकाळात कालानुक्रमाने धरणातील येव्यांमधील बदल तसेच सिंचन व बिगर सिचंन प्रयोजनाकरिता

गरजांमधील बदल व पाणी सोडण्याच्या संदर्भात येणाऱ्या अडचणी विचारात घेवून उर्ध्व भागतील धरण समुहातील पाणी जायकवाडीसाठी सोडण्याच्या परिमाणाचे पुनर्विलोकन करण्याची सुचना केली होती.

त्यानुसार मेंढगिरी समितीच्या अहवालांचे पुनर्विलोकन करण्याकरिता दिनांक २६/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, मेरी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक १४/१०/२०२४ रोजी सादर केलेल्या अहवालामध्ये गोदावरी अभ्यास गट-II (२०२४) न विचारात घेतलेल्या २०१३ ते २०२२ या १० वर्षाच्या अतिरिक्त माहिती/डाटाच्या आधारे पृथकरण करून जायकवाडी धरणाच्या उर्ध्व भागातील धरणातून समन्यायी पाणी वाटप तत्वानूसार पाणी सोडण्यासाठी जायकवाडी धरणात पाण्याची आवश्यक किमान टक्केवारी ६५ % वरून ५८ % पर्यत खाली आणण्याचे शिफारस केली आहे.

सदर समितीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्याकडे दिनांक १४/१०/२०२४ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणामार्फत कार्यवाही प्रगथीपथावर आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ईसापुर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) धरणातून शेनोडी-रामवाडी जलसिंचन योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(७) २२६३ (२८-०४-२०२५). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ईसापुर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) धरणातून शेनोडी-रामवाडी जलसिंचन योजना कार्यान्वित करून त्याची अंमलबजावणी करावी यासाठी पाणी हक्क संघर्ष समितीने तहसीलदार कार्यालयासमोर दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास बेमुदत उपोषण सुरू केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उज्वल पैनगंगा प्रकल्प क्रमांक ४ चे कार्यकारी अभियंता श्री. शेख यांनी शेनोडी-रामवाडी जलसिंचन योजनेचे सर्वेक्षण व अंदाजपत्रकाच्या निविदा ७ दिवसात काढण्यात येतील असे लेखी आश्वासन दिल्याने उपोषण मागे घेण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कार्यकारी अभियंता श्री. शेख यांनी दिनांक २४ सप्टेंबर, २०२४ रोजी दिलेल्या आश्वासनानंतर आजमितीस कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ईसापूर धरणातून शेनोडी-रामवाडी जलसिंचन योजना कार्यान्वित करून त्याची विनाविलंब अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०३-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) याबाबत महामंडळाचे दिनांक २५/०२/२०२५ रोजीच्या पत्रातील सुचनांनुसार प्राथमिक सर्वेक्षणाचे अंदाजपत्रक विभागीय स्तरावर तयार करुन त्यास प्रशासकीय मान्यता तसेच तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. सदर सर्वेक्षण कामाची निविदा काढण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुकडी प्रकल्पांतर्गत डिंभे ते माणिकडोह यांना जोडणाऱ्या बोगद्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत

**(८) २३३० (२८-०४-२०२५). श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडी प्रकल्पांतर्गत डिंभे धरण ते डिंभे कालव्याचे क्षेत्र ५५ किलोमीटर लांबीचे असून डिंभे कालव्याचा विसर्ग १ हजार २४० क्युसेक असून अनेक वर्षांपासून त्या कालव्याची दुरुस्ती न झाल्याने साधारण ३५० क्युसेक पाणी गळती होऊन मोठ्या प्रमाणात सिंचनाचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाचे अतिरिक्त पाणी समुद्रात वाहून जात असल्यामुळे डिंभे ते माणिकडोह यांना जोडणारा १५ किलो मीटरचा बोगधा बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) सदर प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण झाल्यास २ टीएमसी अतिरिक्त पाणी कर्जत पारनेर व श्रीगोंदाच्या शेतकऱ्यांना उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डिंभे ते माणिकडोह यांना जोडणाऱ्या बोगद्याच्या प्रस्तावास मान्यता देऊन बोगद्याचे काम सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०४-०६-२०२६) :** (१) होय.

(२) नाही, हे खरे नाही.

डिंभे ते माणिकडोह बोगदा समुदात वाहून जाणारे पाणी वळविणेसाठी नाही. डिंभे डावा कालव्याच्या नादुरुस्तीमुळे प्रकल्पीय तरतुदीतील पाणी वाहून नेण्यासाठी डिंभे डाव्या कालव्या ऐवजी बोगदा बांधण्याचा पर्याय शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) डिंभे-माणिकडोह बोगद्याचा समावेश कुकडी प्रकल्पाच्या मंजूर तृतीय सुप्रमा अहवालामध्ये नाही. डिंभे - माणिकडोह बोगद्याचा कुकडी प्रकल्पाच्या प्रस्तावित चतुर्थ सुप्रमा अहवालामध्ये समावेश करण्यास शासन पत्र दिनांक २८/०६/२०२२ अन्वये तत्वत: मान्यता दिली आहे. कुकडी प्रकल्पाचा प्रस्तावित चतुर्थ सुप्रमा प्रस्ताव महामंडळाने राज्य तांत्रीक सल्लागार समिती, पुणे कार्यालयास पाठविण्यात आला आहे व छाननीअंती पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे पिंडकेवार (जि. भंडारा) येथील गोसेखुर्द प्रकल्पबाधितांना भूखंड मिळण्याबाबत

**(९) २३५७ (२८-०४-२०२५). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पिंडकेवार, (जि. भंडारा) येथील गोसेखुर्द प्रकल्पाअंतर्गत बाधीत १५ ते २० व्यक्तींना भूखंड देण्याचा निर्णय शासनस्तरावर अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरीत प्रकल्पबाधीतांना जवळपास १० वर्षाचा कालावधी होऊनही अद्यापही नविन भूखंड देण्यात आले नसल्याने गावकऱ्यांमध्ये शासनाप्रती रोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पबाधितांना नवीन भूखंड देण्याबाबत कोणती

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (१२-०५-२०२६) :** (१) हे खरे नाही.

मौजे पिंडकेपार (जि. भंडारा) या बाधित गावठाणाचे पुनर्वसन पर्यायी गावठाण बेला, ता. जि. भंडारा येथे करण्यात आले आहे. मौजे पिंडेकपार येथील १४६ घरे (१४३ खाजगी व ३ सरकारी) संपादित करुन मोबदला वाटप करण्यात आला आहे. एकूण १२३ कुटुंबाना भूखंड वाटप करण्यात आले आहे. उर्वरित २० घरे दुबार असल्यामुळे भूखंड वाटप प्रकियेतून वगळण्यात आले आहेत.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई-विरार महानगरपालिकेच्या नालासोपारा येथील रुग्णालयात सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(१०) २५५७ (०१-०५-२०२५). श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महानगरपालिकेच्या नालासोपारा येथील रुग्णालयात सोयी-सुविधांचा मोठा अभाव असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रुग्णालयातील डॉक्टरांकडे टेथोस्कोप उपलब्ध नसून रुग्णालयातील क्ष-किरणाचा (एक्स रे) अहवाल मोबाईलवर दिला जात असून रुग्णालयात केवळ ३ डॉक्टर कार्यरत असल्याने संध्याकाळच्या वेळेला बाह्यरुग्ण तपासणी (ओपीडी) बंद असते त्याचप्रमाणे भूल तज्ञ, स्त्रीरोग तज्ञ डॉक्टरांची कमतरता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वसई-विरार महानगरपालीकेच्या नालासोपारा येथील रुग्णालयात अद्यावत सोयी-सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे

सोपारा सामान्य रुग्णालयात अपघात विभाग, बाहय रुग्ण विभाग, अस्थिरोग बाहय रुग्ण विभाग, प्रसुती पूर्व विभाग, प्रसुती पश्चात विभाग, शस्त्रक्रिया विभाग, अति दक्षता विभाग, औषध विभाग, क्ष-किरण विभाग, प्रयोगशाळा विभाग इ. असे विविध विभाग कार्यरत करण्यात आले आहेत. तसेच सोपारा सामान्य रुग्णालयात अद्यावत सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी महानगरपालिकेने सिटी स्कॅन, एम.आर.आय. व सी-आर्म मशिनची सेवा नजीकच्या काळात देण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.
(२) अंशत: खरे आहे,

रुग्णालयात स्टेथोस्कोप उपलब्ध होते. मा.लोकप्रतिनिधी यांच्या भेटी दरम्यान क्ष-किरण मशिनचे सॉफ्टवेअर स्थापित करण्याचे काम सुरू असल्याने प्रिंटरची सुविधा उपलब्ध होईपर्यंत एक्स-रे अहवालाची सुविधा मोबाईलवर उपलब्ध करून देण्यात आली होती. दिनांक १५/०१/२०२५ पासून एक्स-रे फिल्मची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

रुग्णालयांत बाह्यरुग्ण सेवा सकाळी ९.०० ते दुपारी १.०० पर्यंत व सायंकाळी ५.०० ते ७.०० पर्यंत

उपलब्ध आहे. अत्यावश्यक रुग्णसेवा व आंतर रुग्ण सेवा २४ तास उपलब्ध आहे. याबाबतचे माहिती फलक रुग्णालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आलेल आहेत. रुग्णालयात एकूण ९ वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून सायंकाळच्या सत्रात तीन वैद्यकीय अधिकारी कार्यरत असतात. रुग्णालयांमध्ये भुलरोग तज्ञ मानद तत्वावर उपलब्ध आहेत. तसेच स्त्री-रोग तज्ञ दररोज कार्यरत आहेत.
(३) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सोपारा सामान्य रुग्णालयात अद्यावत सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी रुग्णालयात अपघात विभाग, बाहय रुग्ण विभाग, अस्थिरोग बाहय रुग्ण विभाग, प्रसुती पूर्व विभाग, प्रसुती पश्चात विभाग, शस्त्रक्रिया विभाग, अति दक्षता विभाग, औषध विभाग, क्ष-किरण विभाग, प्रयोगशाळा विभाग असे विविध विभाग कार्यरत करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, विविध विभागामध्ये विविध सत्रात वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग कार्यरत असून त्यांच्यामार्फत रुग्णांस २४ तास विनामुल्य सेवा देण्यात येते. तसेच सोपारा सामान्य रुग्णालयात अद्यावत सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी सिटी स्कॅन, एम.आर.आय. व सी-आर्म मशिनची सेवा नजीकच्या काळात उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई, (ता. अंबाजोगाई, जि. बीड.) येथे विश्रामगृह बांधकाम करणेबाबत

**(११) २५७२ (०१-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई, (ता. अंबाजोगाई, जि. बीड) येथे अतिमहत्त्वाच्या व्यक्तीसाठी विश्रामगृह बांधकाम करण्याबाबतचे रुपये १३८१.२४ लक्ष रुपयांचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यता व निधीसाठी शासनास सादर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ईमारत अत्यंत जुनी झाली असून जीर्ण झाल्यामुळे वापरण्यायोग्य नसल्यामुळे सदर ठिकाणी नवीन ईमारतीचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असून सदर कामाला प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबतची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक ०८ ऑक्टोंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने विश्रामगृहासाठी किती निधी उपलब्ध करून दिला आहे, वा देण्यात येत आहे, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१०-०६-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी निधी उपलब्धता विचारात घेता अग्रक्रम, निकष व शासनाचे धोरण विचारात घेऊन, योग्य कार्यवाही करण्यात येईल.

---

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे पाणीपुरवठा योजनेचे थकित अनुदान वर्ग करण्याबाबत

**(१२) २६०१ (०१-०५-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता भविष्यात पुरेसा पाणी उपलब्ध होण्याकरिता

भामा-आसखेड धरणातून जलवाहिनी योजना व २४ × ७ पाणीपुरवठा अमृत योजनेच्या टप्पा दोनचे काम सुरू करण्यात आले असून धरणातील जॅकवेलचे कामाकरिता राज्य शासनाकडून ७६ कोटीच्या मंजूर अनुदानापैकी २६ कोटी रुपयांचे अनुदान मागील एका वर्षापासून थकीत असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सात वर्षांपूर्वी शहरातील भागात २४ तास पाणीपुरवठा योजना राबवण्याकरिता महानगरपालिकेने २०७ कोटींची निविदा काढली असून सदर पाणीपुरवठा योजनेअंतर्गत राज्य सरकार मार्फत ५१ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचे ९५ टक्के काम पूर्ण झाले असतानाही मागील पाच वर्षापासून महानगरपालिकेला ५१ कोटी रुपये अनुदानाची रक्कम प्राप्त झाली नसल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पालिकेच्यावतीने भामा-आसखेड योजनेचे व २४ तास पाणीपुरवठा योजनेच्या अनुदानाची थकीत रक्कम मिळण्याबाबत अनेक वेळा पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने भामा-आसखेड योजना व २४ तास पाणीपुरवठा योजनेचे थकीत अनुदान महानगरपालिकेला वर्ग करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२६) :** (१), (२), (३), (४) व (५) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत पिंपरी चिंचवड शहराच्या भामा आसखेड धरणाजवळील अशुद्ध जलउपसा केंद्र (जॅकवेल) योजनेच्या रुपये १५३.३६ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक १७ एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाच्या वित्तीय आकृतीबंधानुसार केंद्र हिस्सा रुपये ३८.३४ कोटी, राज्य हिस्सा रुपये ३८.३४ कोटी आणि महानगरपालिका स्वहिस्सा रुपये ७६.६८ कोटी एवढा आहे.

सदर प्रकल्पास केंद्र हिश्यापोटी रुपये ३४.२४ कोटी आणि राज्य हिश्यापोटी रुपये ३४.२४ कोटी असा एकूण मिळून रुपये ६८.४८ कोटी निधी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस उपलब्ध करून देण्यात आलेला असून उर्वरित केंद्र व राज्य हिश्यापोटीचा एकूण रुपये ८.२० कोटी निधी योजनेची कार्यपद्धतीनुसार, प्रकल्पाची प्रगती, केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीस अनुसरून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस उपलब्ध करून देण्यात येईल.

केंद्र पुरस्कृत जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या रुपये १४३.१७ कोटी किंमतीच्या शहराच्या ४० % भागासाठीच्या २४*७ पाणीपुरवठा प्रकल्पास केंद्र शासनाद्वारे मंजूरी देण्यात आली होती. त्यास अनुसरून सदर प्रकल्पाचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कार्यादेश देण्यात आलेले असून सद्य:स्थितीस सदर प्रकल्पाची ९५ % भौतिक प्रगती झालेली आहे.

प्रस्तुत प्रकल्पातील उर्वरित केंद्र व राज्य हिश्यापोटीच्या रुपये ५१.५४३ कोटी निधीच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शासनास मागणी केली असून याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

---

## नगरपालिकेकडील करवसुलीवर व्याज आकारणी करण्यात येत असल्याबाबत

**(१३) २७३६ (२८-०४-२०२५). श्री.दिलीप सोपल (बार्शी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनपा अधिनियम १९६५ अन्वये नगरपालिकेकडील करवसुलीवर २ टक्के मासिक व्याज आकारणी करण्यात

येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मनपा अधिनियमान्वये आगाऊ (ॲडव्हान्स) कर आकारणी होत असताना माहे डिसेंबर, २०२४ नंतर मासिक २ टक्के व्याज करवसुलीवर आकरणी होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कर संकलनासाठी व्याज आकारणी योग्य असली तर २ टक्के मासिक याप्रमाणे २४ टक्के वार्षिक व्याज आकारणी होते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन व्याज आकरणी जाचक असल्याने यात फेरबद्दल करण्याबाबत शासकीय पातळीकर कोणती कार्यवाही केली तसेच महापालिकाप्रमाणे नगरपालिकास्तरावर देखील थकबाकी वसुलीसाठी सवलत देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

नगरपालिका क्षेत्रामध्ये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ नुसार थकीत मालमत्ता कर रकमेवर प्रत्येक महिन्यासाठी २ टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून आकारण्यात येते.
(२) अंशत: खरे आहे.

नगर पालिका क्षेत्रामध्ये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १५० (अ) नुसार पहिल्या सहामाही कराची रक्कम बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत व दुस-या सहामाही कराची रक्कम प्रत्येक वर्षाच्या ३१ डिसेंबरपूर्वी भरणे आवश्यक आहे. यानुसार आवश्यक असल्याप्रमाणे कराची रक्कम न भरल्यास करभरणा करावयाच्या शेवटच्या दिनांकानंतर थकीत मालमत्ता कर रकमेवर प्रत्येक महीन्यासाठी २ टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून आकारण्यात येते.
(३) अंशत: खरे आहे.

प्रत्येक महीन्यासाठी २ टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून आकारण्यात येत असली तरी ती आवश्यक असल्याप्रमाणे कराची रक्कम न भरल्यास करभरणा करावयाच्या शेवटच्या दिनांकानंतर थकीत मालमत्ता कर रकमेवर आकारण्यात येते.
(४) नगरपालिका/नगरपरिषदा व नगरपंचात क्षेत्रातील थकित मालमत्ता करावरील शास्ती माफ करुन कर वसूल करण्यासाठी प्रोत्साहनात्मक अभय योजना राबविण्याबाबत दिनांक १९ मे, २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इचलकरंजी (जि. कोल्हापूर) शहरातील राजवाडा चौक ते मोठे तळे मार्गावर निर्माण झालेली वाहतुक समस्या

**(१४) २८६१ (२७-०४-२०२५). श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इचलकरंजी (जि. कोल्हापूर) शहरातील राजवाडा चौक ते मोठे तळे मार्गावर दिवसेंदिवस वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याने नागरिकांसह व्यावसायिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता अरुंद असून पादचाऱ्यांसाठी फुटपाथ उपलब्ध नसल्याने उक्त ठिकाणी पार्किंग व्यवस्थापन व्यवस्थित नसल्यामुळे मोठी वाहतूक कोंडी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा

करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलांबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०३-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर रस्त्यावरील वाहतुक कोंडी सोडविण्याच्या अनुषंगाने इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील दुसऱ्या सुधारित मंजूर विकास आराखड्यातील मोठे तळे ते टिळक पुतळ्यापर्यंत १८ मी. विकास योजना रस्ता विद्यमान मध्यापासून दोन्ही बाजूने समान आखणी दर्शवून त्यास शासनाने दिनांक ०४/०२/२०१९ रोजी मंजूरी दिली आहे. सदर रस्त्यामध्ये एकूण ५१ मिळकती बाधित होत असून अंदाजित २५२४.४६ चौ.मी. क्षेत्र बाधित होत असून सदर भुसंपादनाबाबची कार्यवाही इचलकरंजी महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विक्रोळी (पूर्व ) कन्नमवार नगर व टागोर नगर परिसरातील म्हाडाच्या मोकळया भूखंडावर पार्किंग प्लॉट उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१५) ३०९० (०१-०५-२०२५). श्री.सुनील राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्नमवार नगर व टागोर नगर या म्हाडा वसाहतीमधील इमारती हया ५० ते ६० वर्षापूर्वी बांधलेल्या असल्याने अत्यंत जीर्ण व मोडकळीस आल्यामुळे त्या इमारतींच्या पुनर्विकासाची कामे सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुनर्विकास हा खाजगी विकासकाकडून केला जात असून पुनर्विकास करतांना मोकळी जागा कमी होत असल्याने इमारतीकरिता विकासक ५० ते ६० वाहनासाठीच पार्किग उपलब्ध करुन देणार असून इमारतीतील इतर रहिवाशांना पार्किंगकरिता गैरसोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विक्रोळी (पूर्व) कन्नमवार नगर व टागोर नगर येथील वाढता विकास आणि भविष्यात होणारी पार्किगची समस्या लक्षात घेऊन या परिसरातील म्हाडाच्या मोकळया भूखंडावर पार्किंग प्लॉट बनविणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २०/०९/२०२३ रोजी मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महा.गृह.व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा ) बांद्रा, मुंबई यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, विक्रोळी (पूर्व) कन्नमवार नगर व टागोर येथील वाहनतळ निर्माण करणे, मार्केटसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर विकास करणे आणि कन्नमवार नगर -२ संक्रमण शिबिरातील इमारतीच्या आवारातील गाळेधारकांना गाळे देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २०/१/२०२५ रोजी उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महा.गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) बांद्रा, मुंबई यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाहनतळ निर्माण करण्याबात तसेच कन्नमवार नगर -२ संक्रमण शिबिरातील इमारतीच्या आवारातील गाळेधारकांना गाळे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०५-२०२६) :** (१) व (२) कन्नमवार नगर व टागोर नगर या म्हाडा वसाहतीमधील इमारतींचा विकास नियंत्रण नियमावली २०३४ मधील तरतुदीनुसार खाजगी विकासकांमार्फत पुनर्विकास होत असून त्यानुसार इमारतीतील सदनिकांचे क्षेत्रफळ व संख्या यांच्या प्रमाणात वाहनतळ (पार्किंग) तयार करणे

बंधनकारक आहे.
(३) व (४) यासंदर्भातील स्थानिक लोकप्रतिनिधींचे दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२२ रोजीचे व दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजीचे पत्र उपाध्यक्ष, म्हाडा यांना प्राप्त झाले होते.
(५) निवेदनातील भूखंडाबाबत म्हाडास्तरावरुन करण्यात आलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे :-

१. कामगार कल्याण मंडळाशेजारील भूखंड व कन्नमवार नगर, विक्रोळी येथील महिला तंत्रनिकेतनासाठी भूखंड

जलतरण तलाव व क्लब हाऊस (क्लब हाऊस /व्यायामशाळा / जलतरण तलाव) इ. करीता आरक्षित आहे. सदर भूखंड ई-लिलाव करण्याची प्रक्रिया मंडळामार्फत करण्यात आली आहे. सन २०२४ च्या ई-लिलावामध्ये मुंबई मंडळाद्वारे महिला तंत्रनिकेतनासाठी आरक्षित भूखंडाची विक्री करण्यात आली असून ताबा देखील देण्यात आला आहे.

२. टागोर नगर या म्हाडा अभिन्यासातील ग्रुप नं. ७ येथील मोकळा भूखंड रिटेल मार्केट ॲण्ड वेंडिंग झोन यासाठी आरक्षित आहे. सद्यस्थितीत सदर भूखंड अतिक्रमित असुन त्यावरील अनधिकृत बांधकामावर म्हाडामार्फत केलेल्या निष्कासनाच्या कारवाई विरोधात मा. दिवाणी न्यायालयात वेगवगळे दावे न्याय प्रविष्ट आहेत व त्यापैकी पाच दाव्यांमध्ये मा. दिवाणी न्यायालयाचे स्थगिती आदेश रद्द करून दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर आदेशास अनुसरून दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ रोजी म्हाडामार्फत पोलीस बंदोबस्तात निष्कासनाची कार्यवाही नियोजित होती. तथापि, अनधिकृत बांधकाम धारकांनी मा. उच्च न्यायालयाचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०२५ रोजीचे स्थगिती आदेश सादर केल्याने निष्कासनाची कार्यवाही स्थगित करण्यात आली आहे. यास्तव वाहनतळासाठी भूखंड देता येणे शक्य झालेले नाही.

कन्नमवार नगर, विक्रोळी येथील विकास हायस्कूलच्या बाजूस रिटेल मार्केटसाठी आरक्षित भूखंड अस्तित्वात असून सदरचा भूखंड म्हाडामार्फत यापूर्वीच दिनांक ०२ एप्रिल, १९७५ रोजी मनपास हस्तांतरीत झाला असल्याने सदर भूखंडाचा विकास मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळास करणे शक्य नाही.

कन्नमवार नगर २ संक्रमण शिबिरातील इमारतीच्या आवारातील गाळेधारकांना गाळे देण्याबाबत उपस्थित प्रश्नाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, म्हाडा मार्फत कन्नमवार नगर, विक्रोळी येथील म्हाडाच्या जुन्या धोकादायक संक्रमण शिबीर पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात येत आहे. म्हाडाच्या भूखंडावरील जुनी संक्रमण शिबीर इमारती व्यतिरिक्त इमारतीच्या आवारात रस्त्यालगत अनधिकृत बांधकामे असुन या अनधिकृत गाळयांमुळे प्रकल्पांतर्गत नवीन बांधकामास अडथळा निर्माण होत आहे. सदर अनधिकृत गाळेधारकांपैकी बहुतांश गाळेधारकांकडे फोटोपास, गणना पावती असली तरीही ते म्हाडाच्या मंजुर नकाशाप्रमाणे अधिकृत नाहीत.

म्हाडाच्या सर्वेक्षणानुसार, विभागीय कार्यालयाकडुन म्हाड कायदा कलम ९५अ ३ अन्वये १७९ गाळयांना दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजी निष्कासनाबाबत नोटीस देण्यात आल्या होत्या. यासंदर्भात अनधिकृत गाळेधारकांच्यावतीने व लोकप्रतिनिधींनी गाळेधारकांच्या उदरनिर्वाहाच्या दृष्टीकोनातुन कन्नमवार नगर येथील संक्रमण गाळे पुनर्विकास योजनेतील प्रकल्पात निर्माण होत असलेल्या अनिवासी गाळयांमध्ये त्यांचे पुनर्वसन होणेबाबत वेळोवेळी मागणी केली होती. म्हाड कायदा व इतर अनुषंगिक विनियम यानुसार म्हाडा प्रकल्पातील अनिवासी स्वरुपाच्या गाळयांचे वितरण लिलाव पदधतीने करणे अपेक्षित आहे. मात्र सदर प्रकरणी म्हाडाच्या प्रकल्पाच्या भूखंडावर असलेल्या अनधिकृत बांधकामांमुळे मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत असून त्यांच्या निष्कासनाच्या दृष्टीने व्यवहार्य तोडगा काढण्यात आला असून प्राधिकरणाने निवासी शीघ्रगणकाच्या अडीचपट दराने आकारणी करुन पुनर्वसन इमारतीतील अनिवासी गाळे देण्याबाबत ठराव क्र. ७०९२, दिनांक २९ फेंब्रुवारी, २०२४ नुसार निर्णय घेतलेला आहे. तथापि, सदर गाळेधारक सदर ठरावानुसार प्रकल्पातील गाळयाच्या निश्चित दरानुसार विक्री किंमत आकारणीस विरोध करत असल्याने अद्याप ठरावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणे

म्हाडास शक्य झाले नाही. सबब, प्राधिकरणाने तळ मजल्यावरील दुकानी गाळयांच्या शिघ्रगणकाच्या दराने विक्री किंमत आकारणी करुन अनिवासी गाळे देण्याबाबत ठराव क्र. ७१२७, दिनांक ११ जानेवारी, २०२५ नुसार निर्णय घेतला आहे. त्यानुसार वितरणाबाबत व स्थलांतरणाबाबत कार्यवाही अंतिम टप्यात आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोहा (जि.यवतमाळ) गावाला नागरी सुविधा देण्याबाबत

**(१६) ३११० (२७-०४-२०२५). श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोहा (जि.यवतमाळ) गावात सन २०१६ मध्ये हद्दवाढ झाल्याने नागरी सुविधा मिळत नाही तसेच पात्र शेतकरी, मजूर यांना अद्याप एकही घरकूल मंजूर झालेले नसल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे रस्ते, पथदिवे, सांडपाणी वाहिन्या, कचरा संकलन इ.नागरी सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मोहा गावातील नागरीकांना सुविधा पुरविण्यबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

यवतमाळ नगरपरिषदेमार्फत मौजा मोहा हद्दीतील एकूण ४१ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा व १६ लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच, सन २०२४-२५ या वर्षाकरीता एकुण १९ लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेचा लाभ देण्यासाठी प्रस्ताव समाज कल्याण विभाग, यवतमाळ यांच्याकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) शासनाच्या विविध योजनेअंतर्गत मोहा भागातील रस्ते, उद्यानिर्मिती, स्मशानभूमी नुतनीकरण इत्यादी कामे करण्यात आली आहेत. तसेच, यवतमाळ नगरपरिषदेमार्फत घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत मोहा भागात घंटागाडीद्वारे कचरा संकलन करण्यात येत आहे.

मोहा भागात सुरक्षिततेच्या दृष्टीने व अपघात टाळण्यासाठी स्ट्रीट लाईट व हायमास्ट लाईट बसविण्यात आल्या आहेत. तसेच, यवतमाळ शहर पाणीपुरवठा योजना (अमृत) अंतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी वितरण व्यवस्था टाकून पाणीपुरवठा करण्यात येत असून भुयारी गटार योजनेचा डी.पी.आर. यवतमाळ नगरपरिषदेमार्फत तयार करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ येथील नगरपालिकेला आवश्यक मनुष्यबळ व निधी देण्याबाबत

**(१७) ३११३ (२७-०४-२०२५). श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ येथे वाढती लोकसंख्या व क्षेत्रफळ विस्ताराच्या तुलनेत नगरपालिकेमध्ये कर्मचारी-अधिकारी नसल्याने प्रशासनाला नागरी सुविधा देताना अडचणी येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान

निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नगरपालिकेला आवश्यक मनूष्यबळ व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत. प्रशासकीय कामकाजामध्ये अडथळा निर्माण होणार नाही या दृष्टीने महाराष्ट्र नगरपरिषद सेवा संवर्गातील शक्य तेवढी बहुतांश पदे भरण्याचा प्रयत्न करण्यात येत असतो. तसेच कर्मचारी उपलब्ध न झाल्यास इतर कार्यरत राज्यस्तरीय सेवा संवर्ग कर्मचारी, जिल्ह्यातील इतर संवर्ग कर्मचारी अथवा नगरपरिषद कर्मचारी यांचेकडे अतिरिक्त कार्यभार दिला जातो.

तसेच, यवतमाळ नगरपरिषदेस अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतन व भत्यासाठी सन २०२४-२५ मध्ये रु.३२,३१,१८,०००/- व सन २०२५-२६ मध्ये आतापर्यंत रु.५,६२,६४,०००/- इतके सहायक अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातुन राबविण्यात येणारी विटा शहर नळपाणीपुरवठा योजना मार्गी लावण्याबाबत

**(१८) ३१२९ (२४-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातुन राबविण्यात येणारी विटा शहर नळपाणीपुरवठा योजना मार्गी लावण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री यांच्यासमवेत मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात दिनांक २९ जुलै, २०२४ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत शासनास निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विटा शहर नळपाणीपुरवठा योजना प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच, वाढते नागरीकरण व प्रचंड लोकसंख्येचा विचार करता, सदरची योजना लवकरात लवकर मार्गी लावण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०६-२०२६) :** (१) होय, ही खरे आहे.
(२), (३) व (४) विटा नगरपरिषदेचा जलशुद्धीकरण केंद्र, वितरण व्यवस्था, जलकुंभ, हेडवर्क, अशुद्ध पाणी पंपिंग मशीनरी, शुद्ध पाणी पंपिंग मशीनरी व इतर उपांगाचा प्रस्तुत प्रकल्पात समावेश आहे.

नगरोत्थान महाभियानंतर्गत विटा शहराच्या रुपये ८८.११ कोटी किंमतीच्या प्रस्तुत पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक ०९ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

---

## उर्ध्व पेनगंगा प्रकल्पातील क्षतिग्रस्त कालव्यांची वहन क्षमता वाढवून त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१९) ३१५८ (२८-०४-२०२५). अॅड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.राजेश पवार (नायगांव), डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उर्ध्व पेनगंगा प्रकल्पातील क्षतिग्रस्त झालेल्या कालवा प्रणालीच्या दुरुस्तीचे काम गोदावरी पाटबंधारे महामंडळ औरंगाबाद यांचेमार्फत हाती घेण्यात आले आहे,हे खरे आहे काय,

(२) तसेच इसापूर उजवा कालवा व त्यावरील बांधकामे क्षतिग्रस्त असल्याने कालव्याची वहन क्षमता कमी होऊन जवळपास ५०% वर आलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे नियोजित सिंचन क्षमतेवर विपरीत परिणाम होत असून स्थानिक शेतकरी सिंचनाच्या सुविधेपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नियोजित सिंचन क्षमता प्रस्थापीत करण्याच्या दृष्टीकोनातून विशेष दुरुस्ती मोहिम राबवून मुळ संकल्पीत काटच्छेदा नुसार कालवे पुर्ण करणे, त्यांचे अस्तरी करण, क्षतिग्रस्त बांधकामांची तपासणी व दुरुस्ती यासह आवश्यकते नुसार मजबुतीकरण यांची पुनर्बांधणी करण्याची विनंती जलसंपदा विभागाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ३२३ कि.मी. कालवा व २०२ क्षतिग्रस्त बांधकामे तातडीने दुरुस्त करण्याच्या दृष्टीने सतत बैठका घेऊनही सर्वेक्षणाचे काम अद्याप पुर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी सदर कामाच्या प्रस्तावांना मंजूरी देवून निधी उपलब्ध करुन सर्वेक्षणाचे काम तातडीने पुर्ण करुन दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०७-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

इसापूर उजव्या कालव्याची संकल्पित वहन क्षमता ६५.८५ क्युमेक्स आहे. परंतु सदर कालवा क्षतिग्रस्त असल्याने ३४.०० क्युमेक्स इतकाच विसर्ग आवर्तन काळात सोडण्यात येत आहे.

(३) होय, हे अशंत : खरे आहे.

सिंचन पाणीपाळी (Rotation) चा कालावधी वाढल्यामुळे पाणी पाळयांची संख्या कमी होत आहे.

(४) होय, हे खरे आहे.

मा. श्री. अशोक चव्हाण, तत्कालीन मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळुन) महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री नांदेड यांचे पत्र दिनांक ०४/१२/२०२० व श्री. अशोक चव्हाण, मा. विधानसभा सदस्य महाराष्ट्र राज्य यांनी त्यांचे पत्र दिनांक ३०/०७/२०२२ अन्वये सदर कामाबाबत मागणी केली आहे.

(५) व (६) हे खरे नाही.

इसापूर धरणावरील क्षतिग्रस्त कालव्याच्या सर्वेक्षणाचे काम पुर्ण झालेले आहे. महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम (MIIP) टप्पा-१ अंतर्गत उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाच्या रु.३२४.८२ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. सदर कामे क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

प्रश्न उद्भवत नाही.

---

## विक्रोळी येथील कन्नमवार नगर -२ संक्रमण शिबिरातील इमारतीच्या आवारातील गाळेधारकांना गाळे देण्याबाबत

**(२०) ३२३२ (०१-०५-२०२५). श्री.सुनील राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी येथील कन्नमवार नगर -२ संक्रमण शिबिरातील इमारतीच्या आवारात जे गाळेधारक आहेत त्यांना इमारतीच्या तळमजल्याला ८ ते १० हजार स्केअर फूट प्रमाणे गाळे देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी वा सुमारास उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महा.गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) बांद्रा, मुंबई यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त २०० ते २५० गाळेधारकाकडे म्हाडाकडील फोटोपास, सर्व्हे पावती, त्याच्याकडून शासनाचा महसूल वसुल केला जाणे, आदि शासकिय पुरावे असतांनाही गाळेधारकांना गाळे देण्यास विकासकाकडून टाळाटाळ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संक्रमण शिबिर इमारतीमधील लोकांना ज्या निकषाप्रमाणे सदनिका देण्यात आल्या त्याच निकषाच्या धर्तीवर गाळे धारकांना गाळे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०६-२०२६) :** (१) स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपाध्यक्ष, म्हाडा यांना दिनांक ०१/०३/२०२५ अन्वये कन्नमवार नगर वसाहतीतील प्रस्तुत मुद्यांचा समावेश असलेले निवेदन देण्यात आले आहे.

(२) म्हाडा मार्फत कन्नमवार नगर, विक्रोळी येथील म्हाडाच्या जुन्या धोकादायक संक्रमण शिबीर पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात येत आहे. म्हाडाच्या भूखंडावरील जुनी संक्रमण शिबीर इमारती व्यतिरिक्त इमारतीच्या आवारात रस्त्यालगत अनधिकृत बांधकामे असुन या अनधिकृत गाळयांमुळे प्रकल्पांतर्गत नवीन बांधकामास अडथळा निर्माण होत आहे. सदर अनधिकृत गाळेधारकांपैकी बहुतांश गाळेधारकांकडे फोटोपास, गणना पावती असली तरीही ते म्हाडाच्या मंजुर नकाशाप्रमाणे अधिकृत नाहीत.

म्हाडाच्या सर्वेक्षणानुसार, विभागीय कार्यालयाकडुन म्हाड कायदा कलम ९५अ ३ अन्वये १७९ गाळयांना दिनांक १८/०९/२०२३ रोजी निष्कासनाबाबत नोटीस देण्यात आल्या होत्या. यासंदर्भात अनधिकृत गाळेधारकांच्यावतीने व लोकप्रतिनिधींनी गाळेधारकांच्या उदरनिर्वाहाच्या दृष्टीकोनातुन कन्नमवार नगर येथील संक्रमण गाळे पुनर्विकास योजनेतील प्रकल्पात निर्माण होत असलेल्या अनिवासी गाळयांमध्ये त्यांचे पुनर्वसन होणेबाबत वेळोवेळी मागणी केली होती. म्हाड कायदा व इतर अनुषंगिक विनियम यानुसार म्हाडा प्रकल्पातील अनिवासी स्वरुपाच्या गाळयांचे वितरण लिलाव पदधतीने करणे अपेक्षित आहे. मात्र सदर प्रकरणी म्हाडाच्या प्रकल्पाच्या भूखंडावर असलेल्या अनधिकृत बांधकामांमुळे मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत असून त्यांच्या निष्कासनाच्या दृष्टीने व्यवहार्य तोडगा काढण्यात आला असून प्राधिकरणाने निवासी शीघ्रगणकाच्या अडीचपट दराने आकारणी करुन पुनर्वसन इमारतीतील अनिवासी गाळे देण्याबाबत ठराव क्र. ७०९२ दिनांक २९/०२/२०२४ नुसार निर्णय घेतलेला आहे. तथापि, सदर गाळेधारक सदर ठरावानुसार प्रकल्पातील गाळयाच्या निश्चित दरानुसार विक्री किंमत आकारणीस विरोध करत असल्याने अद्याप ठरावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणे म्हाडास शक्य झाले नाही.

(३) शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०१४/ प्र.क्र.१०२ (भाग-१)/दुवपु-२, दिनांक १३/०९/२०१९ नुसार संक्रमण शिबीर इमारतीतील अधिकृत वितरण झालेले गाळे, पुर्व परवानगी न घेता हस्तांतर झालेले गाळे व त्यातील रहिवासी व संक्रमण गाळयात पुर्णपणे अनधिकृतरित्या घुसखोरी केलेले रहिवासी यांचे पुनर्वसन करण्याकरीता

त्यांचे अनुक्रमे अ, ब व क अशा प्रवर्गात वर्गीकरण करण्यात आले आहे व त्या प्रवर्गानुसार विनाशुल्क अथवा सशुल्क पुनर्वसनाबाबत तरतुद करण्यात आली आहे. संक्रमण शिबिरात केवळ निवासी गाळे असुन सदर शासन निर्णय हा केवळ अधिकृत इमारती असलेल्या संक्रमण गाळयांसाठी लागु आहे. तथापि शासन निर्णय दिनांक १३/०९/२०१९ च्या शासन निर्णयास श्री.गुलाम हुसेन उमाटिया यांनी मा. उच्च न्यायालयात आव्हान दिले असून सदर शासन निर्णयानुसार वितरणास मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे.

तथापि, जी बांधकामे संक्रमण शिबीर इमारतीचा भाग नाहीत व संक्रमण शिबीरालगतच्या म्हाडाच्या जागेवर अतिक्रमीत बांधकामे असून संक्रमण शिबीर पुनर्वसन प्रकल्पांतर्गत नवीन इमारतीच्या बांधकामास अडथळा ठरत आहेत. अशा अनधिकृत बांधकामांना उक्त नमूद शासन निर्णयातील निकष लागू नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक मनपामध्ये अत्यावश्यक पदाच्या भरतीचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(२१) ३२५३ (२७-०४-२०२५). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक मनपाच्या गेल्या दोन वर्षापासून प्रलंबित ७६१ अत्यावश्यक पदाच्या भरतीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत २४ वर्षात महापालिकेत सरळसेवेने थेट नोकर भरती झालेली नसल्याने पालिकेकडे ५०% पदे रिक्त असून अपुरे मनुष्यबळ असल्याने आरोग्या व मनपाच्या सर्व सुविधा पुरवण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ७६१ अत्यावश्यक पदाची भरती तातडीने करून सन २०२४ चा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०७-२०२६) :** (१) ते (४) नाशिक महानगरपालिकेतील अभियांत्रिकी तसेच आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन संवर्गातील एकूण ३०० रिक्त पदे सरळसेवा पद्धतीने भरण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या अनुषंगाने संबंधित पदांसाठी वर्तमानपत्रांमध्ये तसेच नाशिक महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सदर भरती प्रक्रियेअंतर्गत परीक्षा दिनांक २४/०२/२०२६ व २५/०२/२०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. सदरील परीक्षेचा निकाल टी.सी.एस. कंपनीमार्फत प्राप्त झाल्यानंतर यशस्वी व पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी (Document Verification) करुन नियमानुसार नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येणार आहे. तसेच नाशिक महानगरपालिकेचा ८८७७ पदांचा सुधारित आकृतीबंध प्रस्ताव शासनस्तरावर निर्णयाधीन आहे.

---

## राज्यात स्वयंपुनर्विकास करणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाबाबत

**(२२) ३६०७ (०५-०५-२०२५). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वयंपुनर्विकास करू पाहणा-या सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुनर्विकासासाठी बँकेतर्फे देण्यात

येणा-या कर्जपुरवठयाच्या व्याजदरात चार टक्के अनुदान देण्याचा अध्यादेश चार वर्षांपूर्वी शासनाने काढूनही अद्यापही त्यांची अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची कारणे काय आहेत, तसेच या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०५-२०२६) :** (१) व (२) स्वयंपुनर्विकास योजनेकरिता ४ टक्के व्याजदरात सवलत देण्याच्या अनुषंगाने नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या आकडेवारीचा तपशील तपासून निर्माण होणाऱ्या आर्थिक भाराबाबतच्या आकडेवारीची तपासणी करण्याची कार्यवाही वित्त विभाग व सहकार विभागामार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई सांताक्रूझ (पु.) येथील व्ही.एन. देसाई रुग्णालयात तीनपैकी दोन ऑपरेशन थिएटर (ओटी) बंद असल्याबाबत

**(२३) ३६६० (०१-०५-२०२५). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई सांताक्रूझ (पु.) येथील व्ही.एन. देसाई रुग्णालयाच्या नुतनिकरणाचे काम दोन महिन्यांपासून सुरु असल्याने रुग्णालयातील तीनपैकी दोन ऑपरेशन थेटर (ओटी) बंद असल्यामुळे वेळेवर शस्त्रक्रिया होत नसल्याने रुग्णांना मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, रुग्णालयातील तिसऱ्या मजल्यावर असलेल्या ओटीमध्ये न्युरोलोजी विभाग आणि ऑर्थपेडीक्स विभागातील गरजू रुग्णांवर शस्त्रक्रिया केल्या जातात तर दुसऱ्या मजल्यावर ईएनटी रुग्णांच्या शस्त्रक्रिया केल्या जातात व पहिल्या मजल्यावर असलेल्या ऑपरेशन थेटर मध्ये गर्भवती महिलांवर शस्त्रक्रिया केल्या जात असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंद असलेली ऑपरेशन थेटर (ओटी) लवकरात लवकर सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत वि. नं. देसाई रुग्णालयात मोठया प्रमाणावरील दुरुस्तीची कामे टप्प्या-टप्प्याने सुरु आहेत. यासाठी एकंदरीत दोन वर्षाचा कालावधी अपेक्षित आहे.

सद्य:स्थितीत तीसऱ्या मजल्यावर दुरुस्तीचे काम सुरु असून तेथील अस्थीव्यंग व मणका विकार शस्त्रक्रियागाराचे दुरुस्तीचे काम सुरु आहे. यास्तव वरील दोनही विभागाच्या शस्त्रक्रिया दुसऱ्या मजल्यावरील शस्त्रक्रियागार येथे ठरवून दिलेल्या दिवसानुसार केल्या जातात. तसेच इतर विभागातील शस्त्रक्रिया हया ठरवून दिलेल्या दिवसानुसार पहिल्या व दुस-या मजल्यावरील शस्त्रक्रियागारामध्ये केल्या जातात. यामुळे सर्वप्रकारच्या शस्त्रक्रिया या वि. नं. देसाई रुग्णालयात सुरु आहेत. सर्व शस्त्रक्रियागृह विभाग नियमित तत्वावर स्वच्छ केले जात असून जंतूनाशक धुराव्दारे निर्जंतुकिकरण देखील केले जाते. यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.
(२) हे खरे आहे.

(३) वि. नं. देसाई रुग्णालयात मोठया प्रमाणावरील दुरुस्तीची कामे सुरु असून पुढील दोन वर्षाच्या कालावधीत टप्प्या-टप्प्याने पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. यास्तव रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी गरजेनुसार उपलब्ध मजल्यावरील शस्त्रक्रियागारामध्ये सर्व शस्त्रक्रियांचे नियोजन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य शासनावर वाढत असलेल्या कर्जाबाबत

**(२४) ३७८० (२८-०४-२०२५). श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनावर सन २०१४-१५ साली २ लाख ९४ हजार कोटी रुपयांचे असलेले कर्ज सन २०२४-२५ पर्यंत ७ लाख ८२ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कर्जाच्या व्याजापोटी राज्याला दरवर्षी जवळपास ५७ हजार कोटी रुपये द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच शासनाने महसूल वाढीसाठी उपाय सूचविण्यासाठी वित्त विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर समितीने महसूल वाढीसाठी पेट्रोल, डिझेल, मद्यविक्री, निर्मिती, गॅस सिलेंडर, मुद्रांक शुल्क वाढ यासारखे उपाय महसूल वाढीसाठी कराव्यात अशा शिफारशी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०२६) :** (१) होय.
(२) होय. सन २०२४-२५ मध्ये रु. ५६,७२७.२० कोटी इतके व्याजाचे प्रदान झाले आहे.
(३) होय.
(४) व (५) सदर बैठकांमध्ये राज्याच्या महसूल वाढीसाठी सखोल चर्चा होऊन विचार विनिमयाअंती आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात येत असतात. त्यानुसार संबंधित विभाग,आवश्यक शासन निर्णय निर्गमित करून योग्य ती कार्यवाही करतात. त्यामुळे प्रत्येक वर्षी राज्याच्या उत्पन्नात रास्त वाढ होत आहे.

वर्ष २०१४-१५ मध्ये राज्याचे स्वत:चे महसूली उत्पन्नात रू.१,३२,६९३.९३ कोटीवरून वर्ष २०२४-२५ मध्ये रू.४,२६,२९१.३४ कोटी अशाी सुमारे तीनपट वाढ झालेली आहे.

---

## मुंबईला नागपूरशी जोडणाऱ्या समृद्धी महामार्गावर वाहन दुरुस्ती, खानपान व स्वच्छतागृहांसह इतर मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याबाबत

**(२५) ३८४९ (३०-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई -नागपूर समृद्धी महामार्गावर वाहन दुरुस्ती, खानपान व स्वच्छतागृहांसह इतर मूलभूत सुविधा अद्यापही उपलब्ध नसल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समृध्दी महामार्गावरील वाशिम जिल्हयातील वनोजानकच्या इंटरचेंज महामार्गावरील

दुभाजकामधील लावण्यात आलेल्या झाडे पाण्या अभावी सुकत असून सुशोभिकरणासाठी केलेला खर्च व्यर्थ ठरत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाशिम जिल्हयातील वनोजानजिकच्या इंटरचेंज महामार्गावर जाणाऱ्या तब्बल ५० ते ६० वाहनांच्या चाके पंक्चर झाल्याची घटना दिनांक २९ डिसेंबर, २०२४ रोजी घडली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, माहे सप्टेंबर, २०२४ महिन्यात महाराष्ट्र रस्ते विकास प्राधिकरणाने महामार्गावर १४ ठिकाणी या सुविधा पुरवण्याची हमी देऊनही अद्यापर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी समृद्धी महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढलेले असून या महामार्गावर मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०५-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.

वाशिम जिल्हयातील वनोजा नजीकच्या इंटरचेंज महामार्गावरील दुभाजकामधील लावण्यात आलेली झाडे पाण्याअभावी सुकल्यामुळे कंत्राटदारास त्या कामाचे देयक अदा करण्यात आलेले नाही. सदर झाडांची पुर्नलागवड करण्यात येईल.
(३) हे खरे आहे.

दिनांक २९/१२/२०२४ रोजी वाशिम जिल्हयातील साखळी क्रमांक २२२/५२० (नागपूर कॉरीडॉर) मध्ये रात्री ट्रेलर क्र. एनएल ०८ एई ७१४३ मधील लोखंडी पत्रा १०० कि.मी.च्या लेनमध्ये पडला व त्यावरुन काही वाहने गेल्यामुळे १३ वाहने पंक्चर झाली. क्षतिग्रस्त वाहनांच्या टायर बदलविण्याकरीता महामार्ग क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून मदत करण्यात आली. सदर घटनेत कोणतीही जिवीतहानी झालेली नाही.
(४) हे खरे नाही.
(५) महामार्ग पोलीसांमार्फत व आर टी. ओ. मार्फत अपघात होऊ नये यांसाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनचालकांना वेळोवेळी समुपदेशन केले जाते. समृध्दी महामार्गावर महामार्ग पोलीसांमार्फत व आरटीओमार्फत इंटरसेप्टर व्हेईकल (Interceptor Vehicle) द्वारे वाहनांचा वेग मोजून, वेग मर्यादा न पाळणाऱ्या वाहन चालकांवर दंड आकारणी करून रस्त्यांवर वेग नियंत्रित करण्यात येतो. समृध्दी महामार्गावरील अपघात टाळणेसाठी आवश्यक दिशादर्शक चिन्हे, सूचना फलके, माहिती फलके, घोष फलके, वेगमर्यादा दर्शक फलके लावणे, लेन मार्किंग करणे, कॅटआईज व डेलिनेटर्स, रम्बलिंग स्ट्रीप्स लावणे इ. उपाययोजना केलेल्या आहेत.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर वाहतूक नियंत्रण करण्यासाठी व अपघात टाळणेसाठी ITS ( इंटेलिजेंट ट्रान्सपोर्टेशन सिस्टीम) यंत्रणा उभारण्यात येत आहे. व सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

समृध्दी महामार्गावर २२ परिपूर्ण मार्ग सुविधा व ७ स्वतंत्र इंधनस्थानके कार्यरत असणार आहेत. सध्या २२ ठिकाणी इंधन स्थानके कार्यरत आहेत व त्या ठिकाणी चहा, पाणी, इतर खाद्यपदार्थ व स्वच्छतागृहांची व्यवस्था आहे.

२२ परिपूर्ण मार्ग सुविधा पुर्णपणे विकसित करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. महामंडळामार्फत लिझ मॉडेल तत्वावर उभारण्यात येणाऱ्या १६ पैकी १३ महामार्ग सोयी-सुविधांच्या कंत्राटदारांसोबत करार करण्यात आलेला आहे. यापैकी ६ ठिकाणी तात्पुरत्या हॉटेल्सची सुविधा सुरु करण्यात आली आहे.

तसेच लँड पूलिंग तत्वावर महामंडळामार्फत विकसित करण्यात येणाऱ्या ६ पैकी ४ महामार्ग सोयी-सुविधांमध्ये कामांना सुरुवात झालेली असून त्यापैकी २ ठिकाणी तात्पुरत्या हॉटेल्सची सुविधा सुरु करण्यात

आली आहे.

मुंबईहून नागपूरच्या दिशेने जाताना मऱ्हळ, डवाळा, वरझडी, मांडवा, रेनकापुर व नागपूरहून मुंबईच्या दिशेने जाताना वरझडी, मऱ्हळ, आमणे या ८ ठिकाणी तात्पुरत्या हॉटेल्सची सुविधा सुरु करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील ॲटॉप हिल येथील १० फायबरची शौचकुपे अज्ञात व्यक्तींनी जाळली असल्याबाबत**

**(२६) ३८५७ (०१-०५-२०२५). श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अँटॉप हिल परिसरातील गोवारी स्मशानभूमी परिसरातील शौचालयाच्या पुनर्बांधणीचे काम पालिकेने हाती घेतल्यामुळे रहिवाशांच्या सोयीसाठी तात्पुरते फिरते फायबरचे शौचालय कंत्राटदाराने गेट क्रमांक ४ जवळ उभे केले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर फिरत्या शौचालयातील फायबरची १० शौचकुपे अज्ञात व्यक्तींनी जाळून टाकल्याची घटना माहे जानेवारी, २०२५ मध्ये घडली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे काय, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

मुंबईतील ॲन्टॉप हिल परिसरातील गोवारी स्मशानभूमी परिसरातील शौचालयाच्या पुनर्बांधणीचे काम पालिकेने हाती घेतल्यामुळे रहिवाशांच्या सोयीसाठी तात्पुरती फायबरची शौचकुपे कंत्राटदारामार्फत गेट क्रमांक.४ जवळ उभी करण्यात आली होती.

(२) हे खरे आहे.

कंत्राटदार मे. आर्मस्ट्रॉंग (इंडिया) कन्स्ट्रकशन्स यांच्या तर्फे सदर ठिकाणी बसविण्यात आलेली तात्पुरत्या स्वरूपाची फायबरची शौचकुपे अज्ञात व्यक्तींनी जाळून टाकल्याची घटना दिनांक ०२/०१/२०२५ रोजी घडली आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

कंत्राटदार मे. आर्मस्ट्रॉंग (इंडिया) कन्स्ट्रकशन्स यांनी दिनांक ०३/०१/२०२५ रोजी ॲन्टॉप हिल पोलिस स्टेशन येथे सदर घटनेबाबत तक्रार दाखल केली आहे. त्याअनुषंगाने ॲन्टॉप हिल पोलिस स्टेशन येथे प्रथम खबरीय अहवाल अदखलपात्र गुन्हा नोंदणी क्रं. २४ अन्वये नोंदविण्यात आला आहे.

---

**मुळा व कुकडी (जि.अहिल्यानगर,जि. पुणे) ही धरणे गाळमुक्त करुन मुळा धरणाची ऊंची वाढविण्याचा प्रस्तावाबाबत**

**(२७) ३९४१ (३०-०४-२०२५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळा व कुकडी (जि.अहिल्यानगर, जि. पुणे) धरण गाळ मुक्त करण्याचे धोरण व मुळा धरणाची ऊंची वाढविण्याचा प्रस्ताव शासनाचे विचारधीन असल्याबाबतचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे

आहे काय,
(२) असल्यास, ही धरणे गाळमुक्त करणे व मुळा धरणाची ऊंची वाढविणे या प्रस्तावाबाबत गोदावरी खोरे अभ्यासगट समितीने या बाबतचा अहवाल तयार केला आहे काय, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ही धरणे गाळमुक्त करुन व मुळा धरणाची ऊंची वाढविल्याने पाणी साठयाच्या उपलब्धेत किती वाढ होणार असून शेती, औद्योगिक व पिण्याचे पाणी याबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने काय अहवाल तयार केला आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२९-०४-२०२६) :** (१) राज्यातील मोठ्या पाटबंधारे प्रकल्पातून गाळ व गाळ मिश्रीत वाळू/रेती निष्कासनाबाबतचे सुधारित धोरण दिनांक ०३/०८/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित केले आहे. त्यामध्ये मुळा प्रकल्पाचा समावेश करण्यात आला आहे. मात्र गाळ निष्कासनाच्या धोरणासंदर्भात न्यायालयीन याचिका दाखल झाल्याने या संदर्भात सुधारित धोरण निश्चितीची बाब सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन आहे.
(२) हे खरे नाही.
दिनांक २६/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार महासंचालक (मेरी), नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गोदावरी अभ्यासगटाची नेमणुक करण्यात आली होती. मुळा व कुकडी (अनुक्रमे जि. अहिल्यानगर व जि. पुणे) ही धरण गाळमुक्त करणे व मुळा धरणाची ऊंची वाढविणे ही बाब या गोदावरी अभ्यास गटाच्या कार्यकक्षेत नसल्याने या प्रस्तावाबाबत गोदावरी खोरे अभ्यास गट समितीच्या दिनांक १४/१०/२०२४ रोजीच्या अहवालात अंतर्भाव नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेकडून आपला दवाखाना योजनेची अमंलबजावणी होत नसल्याबाबत

**(२८) ४१३७ (२८-०४-२०२५). श्री.हेमंत रासने (कसबापेठ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाची महत्वाकांक्षी आपला दवाखाना ही योजना पुणे महानगरपालिकेकडून अद्यापही सुरु करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाने महापालिका हद्दीमध्ये ५८ आपला दवाखाना सुरु करण्याच्या सूचना महापालिकेला दिल्या असून यामध्ये खाजगी जागा भाडयाने घेण्यासही महापालिकेला सांगण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, महापालिकेने महापालिकेच्या जागे मध्ये ही योजना सुरु करावी, असा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने महापालिका आयुक्तांकडून मांडला असून यासाठी महापालिकेच्या केवळ २५ जागा उपलब्ध झाल्या असून या योजनेकरिता राज्य शासनाकडून निधी उपलब्ध व्हावा याकरीता महापालिकेकडून राज्य शासनाला प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, ५८ जागांवर दवाखाने सुरु करण्यास महापालिका प्रशासनाने असमर्थता दर्शविली असून तसेच

जागा मालकांनी आपला दवाखाना सुरु करण्याकरिता जी निविदा प्रक्रिया महापालिकेकडून राबविण्यात आली होती, त्याला अद्यापही मंजूरी मिळाली नाही, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पूणे शहरात आपला दवाखाना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०३-२०२६) :** (१) पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये एकूण २९ ठिकाणी “हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना” कार्यान्वित करण्यात आले असून पुणे महानगरपालिकेमार्फत ३ ठिकाणी व बाह्य संस्थेमार्फत २६ ठिकाणी आपला दवाखाना कार्यान्वित करण्यात आला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) पुणे महानगरपालिका २५ ठिकाणी “हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना” कार्यान्वित करणार आहे. उर्वरीत ३३ दवाखाने बाह्य संस्थेमार्फत कार्यान्वित करणार आहे. सदर संस्थेने २६ ठिकाणी आपला दवाखाना कार्यान्वित केले आहेत.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात डेड लाईनच्या पात्र प्रकल्पग्रस्तांसाठी बांधण्यात आलेल्या निवासस्थानाचे वाटप करण्यात आले नसल्याबाबत

**(२९) ४१७३ (०१-०५-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १९९५ च्या कालमर्यादा (डेड लाईन) च्या पात्र प्रकल्प ग्रस्तांसाठी (PAP) (PTC) कुटूंब निवासस्थान बांधताना वेळोवेळी २२५ चौरस फूट, २६५ चौरस फूट व ३०० चौरस फुटाची कुटूंब निवासस्थान बांधण्याबाबत निर्णय घेतला असतसांना २२५ व २६९ चौ.फूट निवासस्थाने बांधुन तयार असुनही अद्याप वाटप करण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) तसेच सन २०११ च्या डेड लाईनच्या पात्र प्रकल्पग्रस्तांसाठी (PAP) ३०० चौ.फुट कुटुंब निवासस्थान फक्त २.५ लाख रुपये घेऊन त्यांना देण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तयार असलेली निवासस्थाने वाटप न करण्याची कारणे काय आहेत व ही निवासस्थाने तात्काळ वाटप करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे,
(४) असल्यास, २२५ व २६९ चौ. फुटाची सदनिका बांधुन तयार असुन त्या वाटप न केल्यामुळे खराब होऊन त्या ठिकाणी अतिक्रमण होत असल्यामुळे सदर सदनिकाचे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे आहे.

शासनाच्या दिनांक १६/०५/२०१५ व दिनांक १६/०५/२०१८ च्या शासन शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या निकषाच्या आधारे नव्याने पात्र होणाऱ्या तसेच पुनर्वसनापासून वंचित राहिलेल्या झोपडीधारकांचे

पुनर्वसन पीएपी सदनिकामध्ये केले जाते. तसेच, झोपडीधारक सशुल्क निवासी पात्र झाल्यानंतर प्राधिकरणाकडे अर्ज करतात. त्यानंतर प्रचलित कार्यपध्दतीनूसार सहकार कक्षाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर झोपडीधारकाकडून शासनाने निश्चित केलेली रक्कम रु. २.५० लक्ष प्राधिकरणाकडे भरणा करुन घेतल्यानंतर सशुल्क पुनर्वसनासाठी पात्र असलेल्या झोपडीधारकांचे सोडतपध्दतीने पीएपी सदनिका वाटप करुन त्वरीत पुनर्वसन केले जाते. झोपडीधारकांसाठी पीएपी सदनिका वाटप करणे ही निरंतर प्रक्रिया आहे व सदर प्रशासकीय कार्यवाही ठराविक कालावधीत केली जात असून त्याकरीता प्राधिकरणामध्ये नोव्हेंबर, २०१७ मध्ये मिळकत कक्ष स्थापन करण्यात आलेले आहे.
(४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई यांचेकडे प्राप्त झालेल्या पी.ए.पी. सदनिकांची देखभाल प्राधिकरणामार्फत केली जाते. तसेच, सदर सदनिकांच्या सुरक्षेसाठी सुरक्षारक्षक नियुक्त केले आहेत. ते नियमित सदर सदनिकांची तपासणी करुन त्यामध्ये घुसखोरी होणार नाही, याची दक्षता घेतली जाते. अपवादात्मक ठिकाणी अशी बाब आढळल्यास महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्वसन) अधिनियम, १९७१ च्या विनियम ३३ अंतर्गत कारवाई केली जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील म्हाडाच्या अनेक इमारतीत वापराविना मोडकळीस आल्याबाबत

**(३०) ४१९० (०१-०५-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील म्हाडाच्या अनेक इमारतीत एकाही सदनिकेचे वाटप गेली अनेक वर्षापासून न केल्याने या इमारती वापराविना मोडकळीस आल्या असून म्हाडाच्या महसुलात मोठ्या प्रमाणात घट होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, कुर्ला पश्चिम विद्याविहार पश्चिम मानखुर्द येथील इमारतीचा समावेश आहे, तसेच म्हाडाने ज्या इमारती बांधल्या आहेत त्या इमारतीतील सदनिका वितरित करण्यासाठी मासिक आढावा घेत असतानाही ही घरे कोणत्या कारणाने वितरित न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन म्हाडाच्या इमारती आणि त्यातील सर्व घरे वितरित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०३-२०२६) :** (१) नाही.
(२) कुर्ला व मानखुर्द येथील योजनेमधील अर्जदारांना सदनिकेचा ताबा देण्यात आला असून मानखुर्द येथील काही सदनिकांचा ताबा देण्याची कार्यवाही चालु असल्याने व विद्याविहार पश्चिम येथे योजना राबविण्यात आलेली नसल्याने या विभागातील कुठलीही योजना हि वापराविना पडून राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर महानगरपालिका रोजंदारी व बदली कामगारांना सेवेत कायम करण्याबाबत

**(३१) ४२१३ (०१-०५-२०२५). श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर महानगरपालिकेमध्ये सन १९९५ नंतर कार्यरत असलेल्या २४९ रोजंदारी व बदली कामगारांना सेवेत

कायम करण्यासाठी सोलापूर महानगरपालिकाने दिनांक ३१ मे, २०२२ रोजी नगर विकास विभागाकडे प्रस्ताव पाठवला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावात त्रुट्या आढळून आल्याने आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांच्याकडून अतिरिक्त माहिती मागविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सोलापूर महानगरपालिका यांच्याकडून मागविण्यात आलेल्या अतिरिक्त माहितीच्या अनुषंगाने कामगारांना सेवेत कायम करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०७-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांच्याकडून दिनांक २८/०४/२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त झाला असून त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर महानगरपालिका कोंडवाडा व मंडई अधीक्षक यांची चौकशी करण्याबाबत

**(३२) ४२१४ (०१-०५-२०२५). श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील कोंडवाडा अधीक्षक व मंडई अधीक्षक श्री. तैमुर मुलानी (उपयुक्त सोलापूर महानगरपालिका) यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास जुना विडी घरकुल भागातील सागर चौक येथून कंकरेन जातीचे नंदी गुरे वाहक वाहनाने पकडून कोंडवाड्यात काही खाटीक समाजातील तरुणांना हाताशी धरून गोवंश हत्या करीत असलेल्यांना नंदीबैल अवैधरित्या देऊन एक प्रकारे गोवंशाची तस्करी करणाऱ्या अधिकाऱ्याची चौकशी करण्याबाबत बजरंग दलाचे कार्यकर्ते यांनी आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सोलापूर महानगरपालिकेकडील मंडई, कोंडवाडा व लायसन विभागाकडून शहरामध्ये सार्वजनिक रस्ता, मैदाने व इतर अन्यत्र भागामध्ये मोकाट फिरत असलेल्या पशुधनाचा उपद्रव होवू नये म्हणून मोकाट पशुधन पकडून महानगरपालिकेच्या कोंडवड्यात दाखल केली जातात. प्रस्तुत प्रकरणी दिनांक ०२/०१/२०२५ रोजी कोंडवड्यात दाखल झालेल्या पशुधनावर श्री. शाहरुख अहमद म. रफिक इनामदार यांनी मालकी हक्क सांगून सोडण्याची विनंती केली होती. त्यानुसार महानगरपालिकेतील कर्मचारी यांनी संबंधितांकडून आधारकार्ड व पावती क्र.३६९७ अन्वये, रक्कम रु.५०००/- दंड आकारुन पशुधन त्यांच्या ताब्यात देत असताना सदर पशुधनास कोंडवड्यात मारहाण करण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. त्याअनुषंगाने, कोंडवड्यातील संबंधित लिपिक यांना कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला होता. सदर खुलाश्यात संबंधित कर्मचाऱ्यांनी पशुधन हे हिंसक असल्याने पशुधन मालकानेच मारहाण केल्याचे नमूद केले आहे. तसेच सदर कर्मचारी यांनी प्रशासकीय कामकाजात बेशिस्त व बेजबाबदार वर्तन केल्याने दंडात्मक शास्ती करुन यापुढे अश्या घटना घडू नये म्हणून सक्त ताकीद देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील कांदिवली पूर्व येथील आकुर्ली म्हाडा वसाहत या ठिकाणच्या भूखंडावर झालेले अतिक्रमण

**(३३) ४४७१ (०१-०५-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१. मुंबईतील कांदिवली पूर्व येथील आकुर्ली म्हाडा वसाहत या ठिकाणच्या भूखंडावर मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास महामंडळाच्या दुर्लक्षामुळे अतिक्रमण झालेले आहे, हे खरे आहे काय,

२. असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीनी मागणी केल्यानंतरही सदरचे भूखंडावरील अतिक्रमण काढण्यास प्रशासन टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,

३. असल्यास, भूखंडावरील अतिक्रमण लवकरात लवकर हटवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

४. नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०३-२०२६) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

मौजे आकुर्ली कांदिवली (पुर्व) येथील एक मोकळा एच.आय.जी भुखंड क्र.११ हा दिनांक २७/०८/१९९७ मध्ये MTNL या संस्थेस सेवानिवासस्थान बांधण्यासाठी वितरीत करण्यात आला होता. तथापि त्यावर कोणतेही बांधकाम न केल्याने भूखंडाचे वितरण रद्द करुन तो म्हाडाने दिनांक २८/०६/२०२१ रोजी परत ताब्यात घेतला. त्यावेळेस सदर भुखंडावर २८ अतिक्रमणे व ०१ मंदिर आढळुन आले. सदरचा भूखंड म्हाडाच्या ताब्यात येण्याआधीच त्यावर सदरची अतिक्रमणे झालेली होती. त्यापैकी २७ अतिक्रमणे म्हाडामार्फत निष्कासित करण्यात आलेली आहेत. उर्वरीत एका अतिक्रमणधारकाकडुन पुन:श्च ०९ वाढीव अतिक्रमणे करण्यात आल्याचे निदर्शनास आले होते.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर २८ अतिक्रमण धारकांपैकी २७ अतिक्रमणधारकांचे एम.आर.टी.पी. कायदा १९६६ अंतर्गत नोटीस जारी करून दिनांक २४/०३/२०२३ रोजी निष्कासन करण्यात आले आहे. उर्वरित एका अतिक्रमण धारकाने मा. दिंडोशी दिवाणी न्यायालयात दावा दाखल करुन स्थगिती आदेश मिळविले. सदर दावा दिंडोशी येथील दिवाणी न्यायालयाकडून दिनांक २४/०१/२०२५ रोजीच्या आदेशानुसार Dismissed करण्यात आला. तद्नंतर अतिक्रमणधारकाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेले अपिल दिनांक ०१/०४/२०२५ रोजीच्या आदेशानुसार नाकारण्यात आले आहे. म्हाडाकडून दिनांक ०७/०४/२०२५ रोजी अतिक्रमणाचे निष्कासन करण्यात आले आहे. उर्वरित ०१ मंदिर व ०९ अतिक्रमण धारकांची सुनावणी घेऊन त्याबाबतचे आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. त्यानुसार दिनांक ०५/०५/२०२५ रोजी सदर भूखंडावरील ०९ अतिक्रमणांचे म्हाडाकडून निष्कासन करण्यात आले. तथापि सदर निष्कासन कारवाई दरम्यान झालेल्या स्थानिकांच्या विरोधामुळे ०१ मंदिर निष्कासनाची कार्यवाही अद्याप करता आली नाही. परंतु सदर मंदिराच्या निष्कासनाची कारवाई सत्वर करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) लागू नाही.

---

## कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढीबाबत

**(३४) ४४८१ (२३-०४-२०२५). श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेची हद्दवाढ सन १९७२ पासून झालेली नसल्याने शहराचा विकास हो नसल्याने हद्दवाढ करण्याची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हद्दवाढ करणेबाबत कोल्हापूर महानगरपालिकेकडून शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिकेची हद्दवाढ करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२६) :** (१) कोल्हापूर महानगरपालिकेची हद्दवाढ करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून होत आहे.

(२) व (३) कोल्हापूर महानगरपालिकेने लगतच्या ४२ गावांचा समावेश करुन हद्दवाढीचा प्रस्ताव प्रथमत: सन १९९० मध्ये सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने हद्दवाढीबाबतची प्राथमिक उद्घोषणा दिनांक २०/०४/१९९२ रोजी निर्गमित करण्यात आली. परंतू सदर प्रस्तावित हद्दवाढीस त्यामध्ये समाविष्ट केलेल्या सर्व गावांनी तसेच लोकप्रतिनिधींनी विरोध दर्शविल्यामुळे हद्दवाढीचा निर्णय घेण्यात आला नाही. तद्नंतर शहर हद्दवाढीबाबत विविध संघटनामार्फत प्राप्त झालेली निवेदने, यापूर्वी सन १९९२ मध्ये निर्गमित केलेल्या प्राथमिक उद्घोषणेस जवळपास २० वर्षांचा झालेला कालावधी तसेच हद्दवाढीत समाविष्ट होणाऱ्या गावांच्या लोकसंख्येत, उत्पन्नात व भौगोलिक परिस्थितीमध्ये झालेला बदल विचारात घेऊन महानगरपालिकेस सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे सूचित करुन दिनांक १७/११/२०१२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे यापूर्वीची प्राथमिक उद्घोषणा विखंडीत करण्यात आली. तद्नंतर कोल्हापूर महानगरपालिकेने शहरालगतच्या एक किलोमीटर परिसरातील १८ गावांचा व २ एम.आय. डी.सी. क्षेत्रांचा समावेश असलेला हद्दवाढीचा नवीन प्रस्ताव दिनांक १२/०६/२०१५ रोजी सादर केला असता, त्यावर हद्दवाढ विरोधी समिती व हद्दवाढ कृती समिती यांच्यासमवेत झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून दिनांक १६/०८/२०१७ च्या अधिसूचनेन्वये प्राधिकरण गठीत करण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक ०२/०१/२०२५ च्या पत्रान्वये सर्व जिल्हे/तहसिल/शहरे/गावे यांच्या प्रशासकीय सीमा दिनांक ०१/०७/२०२५ पासून जनगणनेकरीता गोठविण्यात आल्या असल्याने हद्दवाढीसंदर्भात कार्यवाही करता आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहर व उपनगरातील ७०० झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(३५) ५०५५ (०१-०५-२०२५). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील ७०० झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प गत १० वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जुलै,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी पूनर्वसन प्रकल्प प्रलंबित असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, झोपडपट्टी पूनर्वसन प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०६-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प प्रलंबित असण्याची सर्वसाधरण करणे:-

A. वित्त आणि इतर कारणांमुळे

B. विकासकाच्या अकार्यक्षमतेमुळे – झोपडपट्टी कायदयाच्या कलम १३ (२) नूसार विकासक काढून, टाकल्यानंतर नवीन विकासकाची नियुक्ती प्रलंबित असणे,

C. न्यायलयीन बाबींमुळे,

D. इतर विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे : जसे की

I. सी. आर. झेड II- ,

II. नागरी विमान वाहतुक प्राधिकरण,

III. संरक्षण विभाग, केंद्र सरकार

(३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत रखडलेल्या झोपु योजना मार्गी लावण्याकरिता शासनाने खालीलप्रमाणे धोरणात्मक उपाययोजना केलेल्या आहेत:-

१) निविदा प्रक्रियेने विकासकाची नियुक्ती करणे.

२) अभय योजना राबविणे.

३) मुंबई महानगर प्रदेशातील झोपडपट्टी पुनर्वसन योजना अन्य महामंडळे प्राधिकरणे/स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामार्फत संयुक्त भागीदारी (JV) तत्वावर योजना राबविणे.

४) झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजना (Slum Cluster Redevelopment Scheme) राबविणे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुही (जि.नागपूर) नगरपंचायतील विकासकामाच्या निधीमध्ये अनियमिता झाल्याबाबत

**(३६) ५१७१ (०१-०५-२०२५). श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुही (जि.नागपूर) येथील नगरपंचायत मधील अध्यक्ष मनमानी कारभारामुळे समप्रमाणात निधीचा वाटप न करता आपल्या मर्जीतील जवळील सदस्यांना निधी वितरीत करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकास कामे निश्चित करताना किंवा विकासनिधी वितरीत करताना भेदभाव करीत असल्याने या विभागातील अनेक वार्डातील विकास कामे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील नगरपंचायतील अध्यक्षाच्या कारभाराची चौकशी करण्यात आली काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

कुही (जि.नागपूर) येथील नगरपंचायतीमध्ये निधीचे वितरण हे नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

कुही नगरपंचायतीच्या वार्डातील कोणतेही विकासकामे प्रलंबित नसून निधीच्या उपलब्धतेनुसार नगरपंचायतीच्या हद्दीमध्ये विकास कामे करण्यात येतात.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हयात स्वातंत्र्य सैनिकांच्या मौल्यवान वस्तू संकलित करण्यासाठी वस्तू संग्रहालय उभारण्याबाबत

**(३७) ५२१४ (२३-०४-२०२५). श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ नगरपरिषदेने स्वातंत्र्य सैनिकांच्या मौल्यवान वस्तू संकलित करुन स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षी यवतमाळ नगरभवनात वस्तु संग्रहालय उभारण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वातंत्र्य सैनिकांच्या मौल्यवान वस्तु व दस्तऐवज नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याने यवतमाळ जिल्हयातील स्वातंत्र्य लढयाची महती व नव्या पिढीला देशभक्तीची भावना रुजविण्यासाठी शासन जिल्हयात वस्तू संग्रहालय उभारणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने नगरभवनात वस्तु संग्रहालय उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०३-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) यवतमाळ नगरपरिषदेच्या माध्यमिक विद्यालयाच्या परिसरात मोकळया जागेत वस्तू संग्रहालय स्थापन करण्याकरीता अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून तांत्रिक मान्यतेसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ यांच्याकडे दिनांक २५/०२/२०२६ रोजी नगर परिषद, यवतमाळ यांचेकडून सादर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धाराशिव जिल्हयातील कृष्णा मराठवाडा अंतर्गत दुधाळवाडी साठवण तलाव ते आंबेहोळ साठवण तलावाचा प्रधान्य क्रमात समावेश करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३८) ५२४८ (२९-०४-२०२५). श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव जिल्हयातील कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प हा अवर्षणप्रवण व कायम दुष्काळी जिल्हयासाठी सिंचनाची व पिण्यासाठी शाश्वत पाणी उपलब्ध करुन देणारा महत्वाकांक्षी प्रकल्प आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाराशिव जिल्हयातील मुख्य व्यवसाय हा शेती हाच आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील सिंचनाचे क्षेत्र वाढवण्यासाठी दुधाळवाडी ता. कळंब साठवण तलाव ते आंबेहोळ

ता. धाराशिव साठवण तलावाचा कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प टप्पा-२ मध्ये प्राधान्य क्रम बदलुन सदर कामाचा प्राधान्याने कामात समावेश करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील प्रकल्पाचा फायदा धाराशिव व कळंब तालुक्यातील शेतकऱ्यांना होणार असल्यामुळे सदर कामाचा प्राधान्याने समावेश करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनीधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत दुधाळवाडी साठवण तलाव ते आंबेहोळ साठवण तलावाचा प्राधान्य क्रमात समावेश करुन कामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०४-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना क्र.१ टप्पा क्र.५ मध्ये दुधाळवाडी साठवण तलाव ते आंबेहोळ साठवण तलाव कामाचा समावेश आहे. शासन पत्र दिनांक १५/०२/२०२१ अन्वये दुधाळवाडी साठवण तलावापर्यंतची कामे हाती घेण्याच्या प्राधान्यक्रमास मान्यता आहे. त्यापुढील कामे करण्यासाठी सदरहू कामाचा प्राधान्यक्रमात समावेश करणे आवश्यक आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या मान्यताप्राप्त प्राधान्यक्रमानुसार कामे पुर्ण झाल्यानंतर पाणीसाठा व सिंचन क्षमता निर्माण होऊन प्रकल्पाचे प्रत्यक्ष लाभ मिळणेसाठी मंजूर प्राधान्यक्रमातील कामाबरोबरच पुढील टप्प्यातील उपसा सिंचन योजना क्र -१ टप्पा क्र-५ अंतर्गत दुधाळवाडी साठवण तलावापर्यंतची कामे करण्यास शासन पत्र दिनांक १५/०२/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर प्रकरणी सर्वेक्षण व अन्वेषणाची कामे पूर्ण करून मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे मार्फत संकल्पन व रेखाचित्र तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

दुधाळवाडी साठवण तलाव ते आंबेहोळ साठवण तलावाचा प्राधान्य क्रमात समावेश होणेबाबतचा प्रस्ताव गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडून प्राप्त झाला असून, पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

## नीति आयोगाच्या वित्तीय आरोग्य निर्देशांक अहवालानुसार महाराष्ट्राचे स्थान घसरले असल्याबाबत

**(३९) ५२८० (२९-०४-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) 'निती' आयोगाच्या वित्तीय आरोग्य निर्देशांक अहवालानुसार राज्यांच्या वित्तीय आरोग्य निर्देशांकात महाराष्ट्र राज्य चौथ्या क्रमांकावरून सहाव्या क्रमांकावर आले असून आर्थिक आघाडीवर महाराष्ट्राची पीछेहाट झाली असल्याचा नीती आयोगाचा निष्कर्ष असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्याचा सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रांमधील खर्चाचे प्रमाण घटण्याबरोबरच कर्जाच्या रक्कमेचा वापर हा आधीचे कर्ज फेडण्यासाठी होत असल्याने उत्पादकता वाढत नसल्याचे निरीक्षण अहवालात

नोंदविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अहवालात राज्याचे स्थान घसरण्याची कारणे काय आहेत तसेच, राज्याचे वित्तीय आरोग्य सुधारण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०२६)** : (१) होय.

निती आयोगाच्या सन २०२५ च्या वित्तीय आरोग्य निर्देशांक अहवालानुसार हे अंशत: खरे आहे. मात्र निती आयोगाच्या सन २०२६ च्या वित्तीय आरोग्य निर्देशांक अहवालानुसार राज्य सहाव्या क्रमांकावरुन पाचव्या क्रमांकावर आले आहे म्हणजे राज्याची एक क्रमांकाने प्रगती झाली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

राज्याच्या विकास कामांसाठी कर्ज उभारणी करणे आवश्यक आहे. वित्त आयोगाच्या निकषानुसार राज्यावरील एकूण संचित दायित्व स्थूल राज्य उत्पन्नाच्या सरासरी २५% ठेवणे अपेक्षित आहे. सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार,राज्यावरील संचित दायित्व १८.८७% इतक्या मर्यादेत आहे.संचित दायित्वाची स्थूल उत्पन्नाशी असलेली सरासरी कमी ठेवण्याच्या क्रमवारीत महाराष्ट्र राज्य हे प्रथम तीन क्रमांकात आहे.

राज्य शासनाने घेतलेल्या विविध धोरणांचा परिणाम म्हणून निती आयोगाच्या सन २०२६ च्या वित्तीय आरोग्य निर्देशांक अहवालानुसार राज्य सहाव्या क्रमांकावरुन पाचव्या क्रमांकावर आले आहे. मात्र राज्याकडून कल्याणकारी योजना आणि अनुदाने या खर्चात जास्त वाढ झाली असल्याने महसूली तूट वाढण्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले असून त्यावर नियंत्रण करण्याचे सूचविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## निम्न तापी पाडळसरे योजनेचा केंद्राच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्याबाबत

**(४०) ५३७५ (३०-०४-२०२५). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील निम्न तापी प्रकल्प पाडळसरेच्या टप्पा ०१ चे सर्व कामे पूर्ण करण्यासाठी रुपये २००० कोटी इतक्या निधीची आवश्यकता असून दरवर्षी अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी केली जाणारी अल्प निधीची तरतुद बघता या प्रकल्पाच्या बांधकामाच्या व इतर कामांमध्ये आवश्यक प्रगती दिसुन येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निम्न तापी पाडळसरे प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी सदर प्रकल्पाचा केंद्राच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्यासाठी शासनाकडून मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास जलसंपदा मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-०६-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे.

निम्न तापी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रु.४८९०.७७ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.

मा. राज्यपाल महोदयांच्या निदेशातील निधी वाटपाच्या सूत्रानुसार महामंडळास प्राप्त होणाऱ्या निधीच्या मर्यादेत प्रकल्पास निधी उपलब्ध करून देण्यात येतो.
(२) होय.
याबाबत लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) शासनाने निम्न तापी पाडळसरे प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्यासाठी केंद्र शासनास दिनांक ३१.५.२०२४ रोजी प्रस्ताव सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांसंदर्भात चौकशीचा अहवाल सादर केला नसल्याबाबत

**(४१) ५६४१ (३०-०४-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हा नियोजन समितीची (DPC) बैठक अमरावती येथे दिनांक ४ ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीत, अमरावती जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराबाबत लोकप्रतिनिधींनी जिल्हा नियोजन बैठकीत तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहु बैठकीत जिल्हा पालक मंत्री महोदयांनी जिल्हाधिकारी यांना त्याबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी सदर चौकशीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०२६) :** (१) अमरावती जिल्हा नियोजन समितीची (DPC) बैठक अमरावती येथे दिनांक ०४/१०/२०२४ रोजी आयोजित करण्यात आली नव्हती, तर सदरची बैठक अमरावती येथे दिनांक ०४/०८/२०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती.
(२) व (३) दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये दोन सदस्यांनी जिल्हा नियोजन अधिकारी, अमरावती यांचेवर कारवाई करण्याची मागणी केली. त्यानुषंगाने, मा. पालकमंत्री अमरावती जिल्हा यांनी मा. लोकप्रतिनिधी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत त्यांची भेट घेऊन त्यांना विश्वासात घेऊन वस्तुस्थिती सांगावी व त्यांचे ३ दिवसात समाधान करावे. त्यांच्या शंकांचे निरसन करावे अन्यथा यानंतर संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालामध्ये नोंद घेण्यात येईल, असे नमूद केले.
(४) व (५) वरीलप्रमाणे.

---

## इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील घरकुलांचे कामे अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत

**(४२) ५७२८ (०१-०५-२०२५). श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या IHSDP योजनेअंतर्गत इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील जयभिमनगर या ठिकाणी ७२० घरकुले बांधणेचे काम मंजुर झाले असून त्यापैकी १०८ घरकुलांची कामे अद्यापही अपुर्णावस्थेत आहेत, हे खरे

आहे काय,
(२) असल्यास, सदर लाभार्थ्यांच्या घरकुलांचे काम पूर्ण न झाल्याने ते सद्य:स्थितीत भाडाच्या घरात राहत असून त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त योजनेंतर्गत अपूर्णावस्थेत असलेली घरकुले तात्काळ पूर्ण करुन लाभार्थ्यांना वितरीत करण्यात यावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ जानेवारी, २०२५ रोजी मा.उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने घरकुले लाभार्थ्यांना वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०७-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

एकात्मिक गृहनिर्माण आणि झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) अंतर्गत इचलकरंजी महानगरपालिकेच्या जयभिमनगर या ठिकाणी ७२० घरकुले बांधण्याचे काम मंजुर होते. त्यापैकी ६१२ घरकुले लाभार्थ्यांना वाटप करण्यात आली आहेत. उर्वरित १०८ घरकुलांचे काम निधीअभावी सुरु झालेले नाही.
(३) हे खरे आहे.
(४) केंद्र शासनाच्या शहरी गरिबांसाठी मूलभूत सेवा योजना (BSUP) व एकात्मिक गृहनिर्माण आणि झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) या योजनांचा कालावधी दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी संपुष्टात आला असल्याने सदर योजनांसाठी यापुढे निधी वितरीत करण्यात येणार नसल्याबाबत तसेच या योजनेअंतर्गत अर्धवट राहिलेली कामे नगरपरिषदेने स्वत:च्या निधीतून पूर्ण करण्याबाबत केंद्र शासनाने गृहनिर्माण विभागास कळविले आहे.

तत्कालीन इचलकरंजी नगरपरिषद कौन्सिल ठराव क्र.६२, दिनांक १०/०८/२०१६ रोजी सदरच्या १०८ घरकुलांच्या बांधकामासाठी IHSDP योजनेच्या प्राप्त निधीवरील बँक व्याजाची रक्कम वापरणेस प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस मान्यता मिळाली असून त्यानुसार नगर परिषदेने दिनांक २०/०१/२०२४ अन्वये, IHSDP योजनेतंर्गत प्राप्त निधीवरील व शिल्लक लाभार्थी हिस्सा मिळून ठेवलेले खात्यावरील व्याजाची रक्कम वापरणेस व प्रशासकीय मान्यता मिळण्याकामी प्रस्ताव गृहनिर्माण विभागास सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये रिक्त असलेली पदे भरण्याबाबत

**(४३) ५७५७ (२८-०४-२०२५). श्री.संग्राम जगताप (अहिल्यानगर शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर शहराचा झालेला विस्तार, वाढलेली लोकसंख्या यामुळे निर्माण होणाऱ्या विविध नागरी समस्या सोडवण्यासाठी महानगरपालिकेमध्ये अपूर्ण कर्मचारी वर्ग असल्यामुळे शहरातील नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिका क्षेत्रामध्ये नागरिकांना सुविधा पुरवण्यासाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद केली असून प्रशासकीय पातळीवर कामे करण्यासाठी महानगरपालिकेकडे पुरेसे कर्मचारी नसल्यामुळे सर्व विकासकामे अर्धवट अवस्थेत असून याचा नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच शहरातील स्वच्छतेवर देखील परिणाम होत असून, अस्वच्छतेमुळे साथीचे रोग वाढत असल्याने

लोकप्रतिनिधींनी वारंवार महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्याबाबतची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने नागरी सुविधा पुरवण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०२-२०२६) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
(४) अहिल्यानगर महानगरपालिकेतील सरळसेवेने भरावयाच्या एकुण ४५ जागांवरील पदभरतीबाबत मे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांचे मार्फत पदभरती प्रक्रिया सुरु आहे. तसेच अहिल्यानगर महानगरपालिकेमधील तत्कालीन रोजंदारी कामगारांना मा. न्यायालयाच्या आदेशाने नियुक्ती मिळालेल्या सफाई कामगारांना लाडपागे समितीच्या धोरणानुसार लाभ मिळणेबाबत. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतुदीनुसार अहिल्यानगर महानगरपालिकेतील सर्व सफाई कामगारांच्या पात्र ठरणा-या वारसांना नोकरी देण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे. माहे मे, २०२५ अखेरपर्यंत सफाई कामगारांच्या ७९ पात्र वारसांना नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. तसेच संपूर्ण कागदपत्र सादर केलेल्या ५१ पात्र वारसांना नियुक्ती देणेबाबत कार्यवाही चालू आहे
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-गोवा महामार्ग तसेच सागरी महामार्ग अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत

**(४४) ५८२८ (०१-०५-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा महामार्ग गेली १७ वर्ष तसेच सागरी महामार्ग हा ३० वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मुंबई ते गोवा केवळ ६ तासांमध्ये १५० कि.मी प्रति तास वेगाने धावू शकणारा कोकणच्या हायस्पीड ग्रीनफील्ड महामार्गाची रुपरेषा राज्य रस्ते विकास महामंडळाने माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये जाहिर केले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कोकणातील १७ तालुक्यातून हा महामार्ग जाणार असल्याने यासाठी ३७९२ हेक्टर जमिनीचे संपादन केले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सागरी महामार्गावर प्रलंबित असलेल्या आगरदांडा, बाणकोट, रेंवस आणि दाभोळ जयगड या पुलांची निविदा नव्याने काढण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी प्रलंबित महामार्गाचे काम पूर्ण होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०५-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ०६.०९.२०२१ अन्वये रेवस ते रेडी सागरी महामार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
(२) अंशत: खरे आहे.

वाहने १००-१२० कि.मी.प्रति तास वेगाने धावू शकणार आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) प्रथम टप्प्यात रेवस रेडी या महामार्गावरील रेवस-कारंजा, केळशी, बाणकोट, रेवदंडा, आगरदंडा, जयगड, कुणकेश्वर, काळबादेवी, दाभोळ या ९ खाडीपुलांची सुमारे रु.९१०५ कोटींची कामे मंजूर असून ७ पुलांची निविदा

प्रक्रिया पूर्ण होऊन कामे प्रगतीत आहेत. तसेच दाभोळ व काळबादेवी खाडी पूलाची निविदा कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) रेवस ते रेडी सागरी महामार्गावरील प्रथम टप्प्यात रेवस रेडी या महामार्गावरील ९ खाडीपुलाची कामे हाती घेतली आहेत. तसेच, रस्त्याची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.
विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ७ छावणी परिषदांच्या हस्तांतरण प्रस्तावाबाबत**

**(४५) ५८६८ (०१-०५-२०२५). श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ७ छावणी परिषदांच्या हस्तांतरणासंदर्भात नवी दिल्ली येथे संरक्षण विभागाच्या सह सचिवांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७/११/२०२४ रोजीच्या सुमारास झालेल्या बैठकीत छावणी परिषदांच्या हस्तांतरणाचे प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यात राज्यातील कोणकोणत्या छावणी परिषदांचा यात समावेश आहे,
(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०७-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) राज्यातील ७ कटक मंडळांपैकी पुणे कटक मंडळ, खडकी कटक मंडळ, औरंगाबाद कटक मंडळ, देवळाली कटक मंडळ, अहमदनगर कटक मंडळ, कामठी कटक मंडळ ह्या ६ कटक मंडळांचा हस्तांतरणासाठी समावेश आहे.
(३) राज्यातील सर्व कटक मंडळ क्षेत्रातील नागरी क्षेत्राचे राज्य शासनास हस्तांतरण करण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक १०/०७/२०२५ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार ६ कटक मंडळांचे प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
संरक्षण मंत्रालय यांच्या मार्गदर्शक तत्वांनुसार कटक मंडळ क्षेत्राच्या सुरक्षेच्या कारणास्तव आणि लष्करी आकलनांचा विचार करून रक्षा मंत्रालय यांचे निर्देशावरुन स्टेशन कमांडर यांच्या दिनांक ०८/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये देहू कटक मंडळाचे समावेशन न करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

---

**कोल्हापूर महानगर पालिका क्षेत्रातील वाहतुकीच्या ठिकाणी चौकातील सिग्नल अद्ययावत करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(४६) ५९६६ (०१-०५-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महानगर पालिका क्षेत्रातील वाहतुकीचे ठिकाणी चौकातील सिग्नल अद्ययावत करणेसाठी निधी उपलब्ध होणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. नगर विकास मंत्री यांना नुकतेच दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने सिग्नल अद्ययावत करण्यास निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०६-२०२६) :** (१) व (२) कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये वाहतुक विनिमयाकरीता विविध चौकामध्ये एकूण ३९ ठिकाणी सिग्नल यंत्रणा बसविण्यात आली आहे. यापैकी दाभोळकर चौक येथे चौकोनी जी.आय.पाईप व अंतर्गत एल.ई.डी. स्ट्रीप असणारे स्मार्ट पोल प्रायोगिक तत्वावर कार्यान्वित करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक, वाहतुक नियंत्रण शाखा, कोल्हापूर यांनी दाभोळकर चौक येथे बसविण्यात आलेल्या अद्ययावत पोल प्रमाणे १६ ठिकाणी स्मार्ट पोल सिग्नल यंत्रणा बसविण्याबाबत मागणी केली आहे. त्यानुसार सर्व ठिकाणाची स्थळ तपासणी महानगरपालिकेकडून करण्यात आली असून खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन आवश्यक निधीचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेहकर (जि. बुलडाणा) येथील प्राचीन सारंगधर बालाजी मंदिराचा तिर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्याबाबत

**(४७) ६२९२ (०८-०४-२०२५). श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेहकर (जि. बुलडाणा) येथील प्राचीन सारंगधर बालाजी मंदिर येथे येणाऱ्या भाविकासांठी कोणत्या तिर्थक्षेत्र विकास योजनेतून सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत,
(२) असल्यास, सारंगधर बालाजी मंदिराला केंद्रस्थानी मानून लगत असलेल्या पैनगंगा नदीवर प्राचीन नृसिंह मंदिर, गायत्री मंदिर व ओरांडेश्वर मंदिर यांना जोडून तीर्थक्षेत्र परिसर विकसीत करण्याबाबत तिर्थक्षेत्र आराखडा शेगावच्या गजानन महाराज संस्थानच्या धर्तीवर तयार करण्यात यावा अशी मागाणी स्थानिकांनी, लोकप्रतिनिधी व विविध सामाजिक संघटनेकडून शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने सदरील तिर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्याबाबत कार्यवाही केली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२६) :** (१) मेहकर (जि. बुलडाणा) येथील प्राचीन सारंगधर बालाजी मंदिर येथे येणाऱ्या भाविकांसाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दिनांक ०५/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत मेहकर नगरपरिषदेमार्फत आवश्यक सुविधा पुरविण्यात येत आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्याकडून दिनांक २१ मे, २०२५ रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मिरा-भाईंदर महापालिकेने कोरोना काळात कोणतीही निविदा न काढता रुग्णांची ने-आण करण्यासाठी 'बरकत' या कंपनीला कंत्राट दिल्याबाबत

**(४८) ६३१४ (०१-०५-२०२५). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईंदर महापालिकेने कोरोना काळात कोणतीही निविदा न काढता मुंबई महानगर क्षेत्र परिवहन

प्राधिकरण समितीने माहे जून, २०२० मध्ये जाहीर केलेल्या दरापेक्षा जास्त दराने रुग्णांची ने-आण करण्यासाठी सौरभ अग्रवाल यांच्या ‘बरकत’ या कंपनीला १८०० रुपये प्रति किमी या दराने सुमारे ५ कोटी रुपयांचे कंत्राट दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने पहिल्या तासासाठी प्रतिक्षा शुल्क आकारु नये व नंतरच्या प्रत्येक तासासाठी ५० रुपये असा दर निश्चित केला असतांना महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी पहिल्या तासापासूनच दुप्पट दराने (१०० रुपये) प्रतिक्षा शुल्काप्रमाणे लाखो रुपये अदा केल्याचे नोंदवहीत केलेल्या अंतराच्या नोंदी ढोबळ व खोट्या असून अधिकाऱ्यांनी कंपनीला आर्थिक हितसंबंधातून मोठा लाभ मिळवून दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०४-२०२६) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

कोवीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने Covid Positive रुग्णांचे High Risk व Low Risk Contacts अलगीकरण केंद्रात नेणेसाठी प्रत्येक आरोग्य केंद्रासाठी व Covid Care Center व Quarantine Centre इ. ठिकाणी ॲम्बूलन्स तातडीने उपलब्ध करुन देणेबाबत वैदयकीय अधिकारी यांनी आयुक्तांकडे मागणी केली होती. त्यानुसार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडे रुग्णवाहिका पुरवठादार ठेकेदारांची बैठक बोलावली असता, मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाचे मंजूर दराप्रमाणे रुग्णवाहिका पुरवठा करण्यास कोणीही ठेकेदार / पुरवठादार तयार नसल्याने, कोविड-१९ प्रादुर्भाव प्रतिबंधात्मक कार्यवाहीच्या अनुषंगाने व “आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, Epidemic Act व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ६७ (३) (क) अन्वये आणी बाणीच्या परिस्थितीमध्ये जनतेच्या सुरक्षिततेसाठी मे. बरकत कॉन्ट्रॅक्टर्स यांनी त्यांचे दिनांक ०२/०७/२०२० रोजीचे पत्रान्वये महानगरपालिकेकडे सादर केलेल्या दराने रुग्णवाहिका भाडेतत्वावर घेण्यात आल्या.

तसेच, कोरोना बाधित रुग्णांना रुग्णालयात / अलगीकरण कक्षात दाखल करण्यासाठी रुग्णवाहिका / खाजगी वाहने अधिग्रहीत करण्याबबात सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. कोरोना-२०२०/ प्र.क्र.१५०/आरोग्य-३ अ दिनांक ३० जुन, २०२० नुसार आयुक्त यांनी रुग्णवाहिका व वाहने अधिगृहित करण्यास व त्यांचे दर निश्चित करण्यास मान्यता दिली.
(३) सदर प्रकरणी मिरा-भाईंदर महानगरपालिका स्तरावर प्राथमिक चौकशी सुरू असून, चौकशीअंती महानगरपालिकेमार्फत यथायोग्य कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आळंदी नगरपरिषदेसाठी भामा आसखेड धरणात वाढीव पाणी आरक्षित करण्याबाबत

**(४९) ६३२० (२३-०४-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील आळंदी येथील मंजूर पाणीपुरवठा योजना सन २०१० ते २०१५ च्या दरम्यान भामा आसखेड धरणातून प्रस्तावित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्यस्थितीमध्ये पुणे महानगरपालिका यांच्याकडून पाणी पुरवठा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आळंदी नगरपरिषदेस पुणे महानगर पालिकाद्वारे लोकसंख्या निश्चित करुन चाकण नगरपरिषदेप्रमाणे आळंदी नगरपरिषदसाठी भामा आसखेड धरणात वाढीव पाणी आरक्षण करण्याबाबतचा प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) भामा आसखेड धरणातील आरक्षण कायम राखून भविष्य काळातील वाढीव लोकसंख्या गृहित धरुन चासकमान प्रकल्पामधून नव्याने पाणी आरक्षण मिळणेबाबत आळंदी नगरपरिषदेने चासकमान पाटबंधारे उपविभाग क्र.५ यांच्याकडे दिनांक २६/११/२०२५ रोजी व मुख्य अभियंता जलसंपदा विभाग यांच्याकडे दिनांक ०५/०३/२०२६ रोजी प्रस्ताव सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**छत्रपती संभाजीनगर महापालिकेत असलेली रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५०) ६९३६ (०१-०५-२०२५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत मागील २५ वर्षांपासून मोठी नोकर भरती करण्यात आलेली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेतील सुमारे ५२०० कर्मचाऱ्यांपैकी १७०० कर्मचारी कंत्राटी असून त्यांच्या पगारावर दर महिन्याला तीन कोटींपेक्षा जास्त खर्च होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिपायांपासून अधिकाऱ्यांपर्यंत कंत्राटी भरतीचे कंत्राट ठराविक एजन्सीकडे देण्यात येत असल्याने कंत्राटी भरती मध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन रिक्त असलेली पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

सन १९९९, २००४, २०१०, २०१९ व २०२३ मध्ये सरळसेवेच्या पदांची भरती महानगरपालिकेकडून करण्यात आलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

महानगरपालिकेच्या आकृतीबंधानुसार ५७१६ पदे मंजूर असून त्यापैकी ३२८४ पदे ही भरलेली आहेत. महानगरपालिकेचे दैनंदिन कार्यालयीन कामकाज पार पाडण्याकरीता विविध ३६ संवर्गामध्ये १८२५ बाह्यस्त्रोताद्वारे कर्मचारी महानगरपालिकेमध्ये कार्यरत आहेत. त्यांच्या करिता दरमहा रु.४ कोटी खर्च महानगरपालिकेला येतो.

(३) हे खरे नाही.

महानगरपालिकेने कळविल्यानुसार वाह्यस्त्रोत संस्थेच्या नियुक्तीसाठी महानगरपालिकेकडून ई-निविदा प्रसिद्ध करुन त्यानुसार सर्वात कमी दर प्राप्त निविदाधारक यांना मनुष्यबळ पुरवठा करण्याचे कंत्राट महानगरपालिकेने दिले आहे.

(४) शासन निर्णय दिनांक ३/१/२०२४ अन्वये आणखी २८६ पदभरतीस महानगरपालिकेस मान्यता दिली असून

त्यापैकी २७४ पदे भरण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून सुरु होती. तथापि, पदे भरण्याची कार्यवाही सुरु असताना बिंदू नामावलीमध्ये बदल झाल्याने नव्याने बिंदू नामावली तयार करण्याचे कार्यवाही सुरू असून त्यानुसार पदभरतीची पुढील कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येते आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.